- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

**सोने-चांदी**
✔ २४ कॅरेट : १,४८,७०० /-
✔ २३ कॅरेट : १,४६,३५० /-
✔ चांदी : २,३८,३००/-

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, २९ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २३० | किंमत : २ रूपये

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# पाऊस आला धावून, विकास गेला वाहून

## २९ जुलै रोजी नागपूर शहर, ग्रामीण, हिंगणा व कामठी तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना सुटी जाहीर
## आवश्यक ती खबरदारी घेण्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे सर्व तालुका दंडाधिकाऱ्यांना आदेश



नागपूरच्या महापौर नीता ठाकरे यांनी पूरग्रस्त भागांची पाहणी केली

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
मुंबईसह उपनगरात गेल्या ४ दिवसांपासून पावसाची दमदार हजेरी पाहायला मिळत आहे, त्यात आजच मुंबईत पावसाने दडी मारल्यानंतर आता विदर्भात मुसळधार पाऊस सुरू झाल्याचं दिसून आलं. नागपूरमध्ये आज पावसामुळे रस्त्यावर पाणीच पाणी झालं होतं. तर, विदर्भात पुढील तीन दिवस मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता असून अनेक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. उद्या २९ जुलै रोजी भारतीय हवामान विभागाने दिलेला इशारा लक्षात घेऊन जिल्हा दंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नागपूर शहर, ग्रामीण, हिंगणा व कामठी तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना सुट्टीचे आदेश निर्गमित



केले आहेत. तसेच, नागरिकांनीही आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

**विदर्भासाठी इशारा**
नागपूरला हवामान विभागाने ३० जुलै रोजी ऑरेंज अलर्ट दिला असून प्रशासनाने गावपातळीवर खबरदारीच्या सूचना दिल्या आहेत. गेल्या २४ तासांत विदर्भात सर्वाधिक १३९ मिमी पावसाची नोंद भंडारा जिल्ह्यातील साकोली येथे झाली. गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी येथे १०३.४ मिमी पाऊस झाला. या दोन्ही ठिकाणी अतिवृष्टीची नोंद झाली.
हवामान विभागानुसार २९ जुलै रोजी नागपूर, भंडारा, वर्धा, या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट तर चंद्रपूर, गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट तर यवतमाळसह अकोला, अमरावती, बुलडाणा व वाशिम जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या भागांत काही ठिकाणी अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.
३० जुलै रोजी चंद्रपूर जिल्ह्यास रेड अलर्ट असून भंडारा, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा आणि अमरावती जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट आहे. अकोला, बुलडाणा, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट आहे. ३१ जुलै रोजी अकोला, अमरावती, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे.

**मुंबईसह उपनगरातही पावसाचा अंदाज**
मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशात ३० आणि ३१ जुलैदरम्यान पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः रायगड, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांमध्ये ३० जुलै रोजी पावसाची तीव्रता अधिक राहण्याची शक्यता आहे.

नागरिकांसाठी सूचना
मेघगर्जना सुरू असताना उघड्यावर न थांबणे, झाडाखाली आश्रय न घेणे, नदी-नाले व पूरग्रस्त भागांपासून दूर राहणे तसेच वीज पडण्याच्या शक्यतेमुळे आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

### हुडकेश्वर-नरसाळा परिसराची महापौरांकडून पाहणी, नागरिकांशी साधला थेट संवाद

हुडकेश्वर-नरसाळा एसटीपी प्लांट परिसरातील नाल्यावरील पुलावरून पावसाचे पाणी वाहत असल्याने परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली. तसेच पावसाचे पाणी साचल्यामुळे परिसरातील काही घरांमध्येही पाणी शिरल्याची घटना घडली. या पार्श्वभूमीवर नागपूर महानगरपालिकेच्या महापौर निता ठाकरे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली आणि नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. महापौरांसोबत उपमहापौर लिला हाथीबेड, झोन सभापती ज्योती देवघरे, अग्निशमन विशेष समिती सभापती रुपाली ठाकूर, नगरसेवक मडावी तसेच सहायक आयुक्त नरेंद्र बावनकर यांच्यासह अग्निशमन विभागाचे जवान प्रामुख्याने उपस्थित होते.
पाहणीदरम्यान महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना परिस्थितीवर तातडीने नियंत्रण मिळविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. नाल्यावरील पुलावरील वाहत्या पाण्यामुळे नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी तसेच वाहतुकीची सुरळीत व्यवस्था करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळी महापौरांनी परिसरातील नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी, घरांमध्ये शिरलेल्या पाण्यामुळे झालेले नुकसान आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत माहिती घेतली. नागरिकांनीही आपल्या समस्या महापौरांसमोर मांडत कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली.

### थोडक्यात

## तरुणाला कारने फरफटत नेले

**मुंबई :** मिरारोड पूर्व येथील पेणकरपाडा परिसरात झोमॅटो डिलिव्हरी करणाऱ्या तरुणाला भरधाव कारने धडक देऊन फरफटत नेत गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हिट अँड रन प्रकरणाचा थरारक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, काशीमीरा पोलिसांनी संबंधित कारचालकाला अटक करून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.
धनश्याम फुलचंद गुप्ता (वय ३०) हे झोमॅटोमध्ये डिलिव्हरीचे काम करतात. २७ जुलै रोजी सकाळी सुमारे ६.५० वाजण्याच्या सुमारास ते त्यांच्या दुचाकीवरून (एमएच-०४ एमएक्स-२३६४) डिलिव्हरीसाठी जात असताना पेणकरपाडा येथील प्रभाकर म्हात्रे यांच्या बंगल्यासमोरील बीअर शॉपजवळ मागून भरधाव आलेल्या टोयोटा हायराईड कारने (एमएच-०१ एफई-५९१९) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या घटनेचा एक थरारक व्हिडीओही समोर आला असून, कार बाईकला फरफटत नेत असल्याचे त्यामध्ये दिसत आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, त्यानंतर या घटनेची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

## अमरावतीत भरधाव ट्रकच्या धडकेत दोन महिला ठार



**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**
राज्यातील रस्ते अपघाताच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. गेल्या काही महिन्यात सातत्याने रस्ते अपघाताच्या घटना पाहायला मिळत आहे. त्यातच, आता अमरावती शहरातील राजापेठ उड्डाण पुलावरही भीषण अपघाताची घटना घडली असून या अपघातात दोन महिला जागीच ठार झाल्या आहेत. बांधकाम साहित्याच्या दळणवळणासाठी वापरण्यात येणाऱ्या मालवाहू ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने ही दुर्घटना घडली, याबाबत माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. भरधाव ट्रकने दुचाकीस्वारास धडक दिल्याने ही दुर्घटना घडली असून अपघानंतर ट्रक ड्रायव्हर घटनास्थळावरुन पसार झाला आहे.
गौरी प्रमोद धर्माळे (वय २७) आणि हर्षा आदेश गावंडे (वय ३९) अशी अपघातातील मृत महिलांची नावे आहेत. अपघातानंतर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. तसेच, मृतदेह शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. दरम्यान, अपघाताच्या घटनेनंतर राजापेठ उड्डाणपूलावर वाहनांची मोठी रांग लागली होती, त्यामुळे वाहतूक काही काळ ठप्प झाल्याचं दिसून आलं.

## राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येणार नाहीत : शरद पवार

**बारामती :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांच्या पुन्हा एकत्र येण्याच्या शक्यतेबद्दल मंगळवारी शरद पवार यांना विचारण्यात आले. यावर त्यांनी दोन्ही गट एकत्र येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे सांगितले. एक दिवसापूर्वी, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)चे सुप्रिया सुळे आणि बजरंग सोनवणे सोमवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना रिसेप्शनचे आमंत्रण देण्यासाठी पोहोचले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री म्हणाले, आता काहीही सांगता येत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) प्रमुख शरद पवार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीवर मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, शरद पवार आणि पंतप्रधान मोदी यांच्या भेटीत काय चर्चा झाली, हे कोणालाच माहीत नाही. सध्या फक्त अफवा आणि तर्कवितर्क आहेत. यावर सध्या काहीही बोलता येणार नाही. गेल्या पाच दिवसांत भाजपच्या नेत्यांसोबत ही सुप्रिया सुळे यांची दुसरी महत्त्वाची भेट होती. यापूर्वी २२ जुलै रोजी त्यांनी शरद पवारांसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. शरद पवारांनी मोदींना एक पत्रही सादर केले होते. ही बैठक सुमारे २० मिनिटे चालली होती. या बैठकीबाबत शरद पवारांनी सोशल मीडियावर एका पोस्टमध्ये म्हटले, नीट परीक्षेतील पेपरफुटी, त्याविरोधात विद्यार्थ्यांचे आंदोलन, आंदोलनादरम्यान पोलिसांचे गैरवर्तन आणि विद्यार्थ्यांवर दाखल झालेले गुन्हेगारी खटले यासह कृषी क्षेत्राशी संबंधित अनेक मुद्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी सविस्तर चर्चा झाली.

# व्रतस्थ पत्रकारितेचा दीप मालवला
# ल.त्र्यं.जोशी यांचे निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
तरुण भारत व लोकशाही वार्ता दैनिकांचे माजी संपादक लक्ष्मण त्र्यंबक जोशी यांचे मंगळवारी दुपारी वयाच्या ८८ व्या वर्षी खाजगी रुग्णालयात निधन झाले. पत्रकारितेतील ज्येष्ठ, अभ्यासू व निःस्पृह व्यक्तिमत्त्व म्हणून ते ओळखले जात. सुमारे ६ दशकांच्या प्रदीर्घ कारकीर्दीची सुरुवात त्यांनी 'तरुण भारत' दैनिकात वार्ताहर म्हणून केली आणि आपल्या कर्तृत्वाने ते मुख्य संपादक पदापर्यंत पोहोचले. सेवानिवृत्तीनंतर जळगाव तरुण भारत, मुंबई तरुण भारत, गोव्यातील गोवादूत आणि गोमंतक, नागपूरचे लोकशाही वार्ता या दैनिकांचे संपादक म्हणूनही त्यांनी कार्य केले.
सामाजिक प्रश्नांसोबतच विकासात्मक पत्रकारितेवर त्यांचा नेहमीच भर राहिला. नवोदित पत्रकारांना मार्गदर्शन करण्यात ते नेहमीच आघाडीवर असत. त्यांची अंत्ययात्रा बुधवार, दि. २९ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता पुखराज टुलिप अपार्टमेंट, १७९ सहकारनगर येथील निवासस्थानावरून निघून सहकारनगर घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येईल. त्यांच्या पश्चात पत्नी ऊर्मिला, २ मुली, जावई, नातवंड आणि चाहत्यांचा मोठा परिवार आहे.

### लक्ष्मणराव जोशी यांच्या निधनाने व्रतस्थ संपादकाला मुकलो!
### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शोकसंवेदना

नागपूर तरुण भारतचे माजी मुख्य संपादक ल. त्र्यं. उपाख्य लक्ष्मणराव जोशी यांच्या निधनाने पत्रकारितेतील एक मोठे चिंतनशील, व्रतस्थ व्यक्तिमत्त्व, विविध विषयांचे गाढे अभ्यासक आपल्यातून हरपले आहेत, अशी शोकसंवेदना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. पत्रकारितेतील ज्येष्ठ, अभ्यासू व निस्पृह व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित असलेले ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मणराव जोशी यांचे मंगळवारी (२८ जुलै) दुपारी २ वाजता देवनगर येथील सत्यम हॉस्पिटल येथे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. पत्रकारितेतील आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी सुरुवातीला 'तरुण भारत' या दैनिकात पत्रकार म्हणून कार्य केले. त्यानंतर काही काळ गोव्यात पत्रकारिता केल्यानंतर ते पुन्हा नागपूरला परतले आणि 'तरुण भारत' मध्ये कार्यरत राहिले.आपल्या शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणाले की, राजकारण, सिंचन अनुशेष हे त्यांच्या आवडीचे विषय होते. पत्रकार म्हणून एखादा प्रकल्प दत्तक घेत त्यावर सातत्याने लिखाण करण्याची परंपरा त्यांनी सुरु केली. गोसिखुर्द प्रकल्पावर त्यांनी विपुल लेखन त्याच परंपरेत केले होते. तरुण भारतात त्यांची प्रदीर्घ कारकिर्द झाली आणि तेथूनच ते निवृत्त झाले. पण, त्यानंतरही गोवा आणि इतर ठिकाणी विविध वृत्तपत्रात त्यांनी संपादक म्हणून आपली कारकिर्द गाजवली. त्यानंतरही समाजमाध्यमांवर सातत्याने त्यांनी आपली लेखणी जिवंत ठेवली. संपादकपदावर असतानाही हाडाचा पत्रकार कशाला म्हणतात, त्याचे ते मूर्तिमंत होते.
माझ्या वडिलांच्या काळापासून त्यांचा परिचय होता. त्यामुळे सातत्याने त्यांचे मार्गदर्शन असायचे. एक अभ्यासू आणि पितृतुल्य व्यक्तिमत्त्व त्यांच्या निधनाने मी गमावले आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात मी सहभागी आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.नागपूरमधील ज्येष्ठ पत्रकार आणि संपादक लक्ष्मणराव जोशी यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. अभ्यासू वृत्ती आणि सामाजिक भान यांचा संगम असलेली त्यांची पत्रकारिता अनेकांसाठी प्रेरणादायी ठरली. त्यांनी आपल्या लेखणीतून समाजमन घडविण्याचे कार्य केले, तसेच असंख्य पत्रकारांना मार्गदर्शन करत त्यांनी मूल्याधिष्ठित पत्रकारितेची समृद्ध परंपरा जपली. त्यांच्या निधनाने मराठी पत्रकारिता क्षेत्राने एक ज्येष्ठ, अभ्यासू आणि तत्त्वनिष्ठ व्यक्तिमत्त्व गमावले आहे. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याचे बळ देवो, असे फडणवीसांनी एक्स पोस्टमध्ये लिहिले आहे.

नागपूरमधील ज्येष्ठ पत्रकार, संपादक लक्ष्मणराव जोशी यांच्या निधनाचे वृत्त ऐकून अतिशय दुःख झाले. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. लक्ष्मणराव यांनी गेली अनेक दशके व्रतस्थ आणि आदर्श पत्रकारिता केली. त्यांनी अनेक पत्रकारांना घडवले व त्यांच्या लेखणीला धार देण्याचे काम केले. शेवटपर्यंत आपल्या लेखणीतून ते समाजप्रबोधनाचे कार्य करत राहिले. त्यांच्या निधनाने मराठी पत्रकार सृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे. ईश्वर दिवंगत आत्म्यास शांती प्रदान करो.

**- नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री**

### सत्यान्वेषी पत्रकारितेचे पर्व काळाच्या पडद्याआड

तरुण भारत या दैनिकाचे माजी मुख्य संपादक आदरणीय श्री लक्ष्मणराव जोशी यांच्या निधनाने सत्यान्वेषी आणि व्यासंगी पत्रकारितेचे एक पर्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. दिवंगत लक्ष्मणराव पत्रकारितेतील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व होते. पत्रकारितेतील आपल्या प्रदीर्घ वाटचालीत त्यांनी समाजातील विविध घटकांना न्याय देण्याचे कार्य केले. पत्रकार कधी निवृत्त होत नाही, असे ते नेहमी म्हणायचे. त्यामुळे अलीकडचा काही काळ सोडला तर ते शेवटपर्यंत कार्यरत होते. त्यांनी पत्रकारांच्या अनेक पिढ्या घडविल्या. शांत आणि संयमी स्वभावाच्या या ज्येष्ठ संपादकाने पत्रकारितेतील मूल्यांशी कधी तडजोड केली नाही. त्यांची उणीव नेहमी जाणवत राहील.
दिवंगत लक्ष्मणराव जोशी यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती प्रदान करो, ही प्रार्थना. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात मी सहभागी आहे.

**- चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री**

संपादकीय लेखणीतून...

# टास्क फोर्स

देशातील परीक्षा व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी तंत्रज्ञ डॉ. नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखाली टास्क फोर्स नेमल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी सोशल मीडियावरून केली. देशातील परीक्षा व्यवस्था पारदर्शक व विश्वासार्ह बनवण्यासाठी हा टास्क फोर्स नेमल्याचे मोदी यांनी जाहीर केले. नीट पेपरफुटी प्रकरणी कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनामुळे गत काही दिवसांत केंद्र सरकारने शिक्षण व्यवस्थेच्या संदर्भात अनेक निर्णय घेतले. त्यातला हा ताजा निर्णय असून मोदी यांनी रविवारी सायंकाळी आपल्या सोशल मीडियावरून व्हीडीओद्वारे त्याची घोषणा केली. ते म्हणाले की, नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखाली परीक्षा पद्धतीत बदल करण्यासाठी उच्च स्तरीय समिती बनवली आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक सुरक्षित बनवण्यासाठी अनेक पावले उचलण्यात येत आहेत. हा टास्क फोर्स परीक्षा सुधारणांसाठी आपल्या शिफारसी करेल. त्या आधारे सरकार त्याची अंमलबजावणी करणार आहे. एक मजबूत आणि पारदर्शक परीक्षा पध्दतीची निर्मिती करण्यासाठी तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त कसा वापर करता येईल यावर हा टास्क फोर्स आपल्या सूचना देईल. शिक्षण व्यवस्थेतील परीक्षा प्रक्रियेला पेपरफुटीच्या गंभीर व्याधीने ग्रासले आहे याची जाणीव केंद्र सरकारला अगोदरच का झाली नाही? असा प्रश्न पडतो.

विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी नीट, एमपीएससी अशा परीक्षांचे अनन्य साधारण महत्त्व आहे. महत्त्वाच्या परीक्षांना पेपरफुटीचे ग्रहण लागल्यामुळे देशातील विद्यार्थ्यांवर प्रखर आंदोलन करण्याची वेळ आली. नीट परीक्षा पेपरफुटीच्या अगोदरसुद्धा अनेक वेळा अशा घटना घडल्या तेव्हापासूनच केंद्र सरकारच्या शिक्षण विभागाने सतर्क होऊन कारवाई करणे अपेक्षित होते मात्र केंद्रामध्ये सत्तेवर असलेल्या बहुमतातील सत्ताधारी पक्षाने पेपरफुटीच्या घटना गांभीर्याने घेतल्याच नाहीत. तरुण विद्यार्थ्यांच्या गर्दीचे मोहोळ जंतरमंतरवर जमा होऊन सत्ताधाऱ्यांना आव्हान देऊ लागले. सोनम वांगचुक यांनीही उपोषणाचे शस्त्र उगारले तरीसुद्धा सरकारने अनेक दिवस काहीच हालचाल केली नाही. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचे लोण देशभर पसरल्यानंतर मात्र पेपरफुटीच्या सुधारणा विधेयकाला मान्यता देण्यात आली. केंद्र सरकारला हे शहाणपण अगोदरच सुचले असते तर संपूर्ण देश विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे ढवळून गेला नसता.

लोकशाहीत विरोध नोंदवणे, निदर्शने करणे आणि शांततापूर्ण मार्गाने सरकारला जाब विचारणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे; परंतु दिल्ली पोलिसांच्या माध्यमातून प्रशासनाने ज्या पद्धतीने आंदोलनाला पायबंद घालण्यासाठी नवे मार्ग शोधून काढले आहेत ते अत्यंत चिंताजनक आणि संवेदनहीन आहेत. आंदोलने होणाऱ्या किंवा प्रतिबंधात्मक आदेश लागू असलेल्या भागात ॲप आधारित कॅब सेवा, अन्न वितरण आणि ई-कॉमर्स सेवा रोखण्याचे तसेच जिओ-फेन्सिंग करून सेवा खंडित करण्याचे दिलेले निर्देश म्हणजे थेट नागरिकांच्या मुलभूत गरजांवरच घाला घालण्यासारखे आहे. युद्धाच्या काळात शत्रूची रसद तोडून शरणागती पत्करायला लावण्याची रणनिती वापरली जायची; परंतु स्वतंत्र, लोकशाही भारतात स्वतःच्याच नागरिकांवर, निदर्शकांवर अशी वेळ आणणे कितपत योग्य होते? अन्नाची आणि पाण्याची डिलिव्हरी रोखून आंदोलकांना उपाशी ठेवण्याचा प्रयत्न करणे, हे कोणत्याही नागरी प्रशासनाला शोभणारे नाही. हा केवळ आंदोलकांचा प्रश्न नसून प्रशासनाच्या संवेदनहीनतेचा ज्वलंत पुरावा आहे. वर्षानुवर्षे अहोरात्र मेहनत करून वैद्यकीय आणि व्यावसायिक अभ्यासक्रमाची स्वप्ने पाहणाऱ्या विद्यार्थ्यांचा विश्वासघात झाला आहे.

एनटीएसारखी देशातील सर्वोच्च आणि महत्त्वाची संस्था जी जेईई, नीट आणि सीयूईटीसारख्या सुमारे २० राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांचे नियोजन करते ती संस्था आऊटसोर्सिंग आणि तांत्रिक गोंधळाच्या आधारे चालवली जात होती, ही बाबच मुळात अत्यंत धक्कादायक आहे. सरकारी यंत्रणांनी परीक्षेचे गांभीर्य न ओळखता खासगी कंत्राटदारांच्या दावणीला संपूर्ण प्रक्रिया बांधली. पेपर फुटल्यानंतर किंवा डिजिटल मूल्यमापनात तांत्रिक घोळ झाल्यानंतरच प्रशासनाला जाग यावी, यासारखे दुसरे दुर्दैव नाही. पंतप्रधान मोदी यांच्या निर्देशानंतर विशेष फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन केले जात आहे आणि सार्वजनिक परीक्षा कायद्यांतर्गत गुन्हे चालवले जाणार आहेत मात्र, इथे प्रश्न उपस्थित होतो की, कायदे आणि फास्ट ट्रॅक न्यायालये नेहमीच गुन्हे घडल्यानंतर अस्तित्वात येतात; पण गुन्हा घडूच नये यासाठीची भक्कम सुरक्षा यंत्रणा उभारण्यात सरकार प्रत्येकवेळी अपयशी का ठरते? आता तज्ज्ञांची समिती स्थापन करून महिनाभरात एनटीएच्या रचनेत मोठे फेरबदल करण्याचे दावे केले जात आहेत. कागदावर सुधारणांच्या गप्पा मारणे सोपे असते; पण प्रत्यक्षात शिक्षण व्यवस्थेत खोलवर रुजलेला भ्रष्टाचार आणि कंत्राटी पद्धतीचा पोकळपणा दूर करण्याचे धाडस का दाखवले जात नाही? ४७ अधिकाऱ्यांची गच्छंती ही केवळ जनतेचा आणि विद्यार्थ्यांचा संताप शांत करण्यासाठी केलेली धूळफेक ठरू नये.

कारण मूळ रॅकेट चालवणारे दलाल आणि या भ्रष्ट साखळीतून करोडो रुपये कमावणारे शिक्षण माफिया अजूनही उजळ माथ्याने फिरत आहेत. केवळ सनदी अधिकाऱ्यांची बदली करणे किंवा कर्मचाऱ्यांना बडतर्फ करणे हा कायमस्वरूपी उपाय असू शकत नाही. ही कारवाई म्हणजे रोगापेक्षा उपायच केलेला निव्वळ बनाव आहे. जोपर्यंत परीक्षेचे अति-केंद्रीकरण थांबवले जात नाही आणि कंत्राटी पद्धतीऐवजी अत्यंत सुरक्षित, पारदर्शक व संपूर्णपणे उत्तरदायी सरकारी यंत्रणेमार्फत परीक्षा घेतल्या जात नाहीत तोपर्यंत पेपरफुटीची ही कीड नष्ट होणार नाही. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते छपाई, वाहतूक, परीक्षा आयोजन आणि मूल्यमापनापर्यंत प्रत्येक टप्प्यावर सुरक्षा निश्चित करणारी एक शाश्वत, तंत्रज्ञान आधारित आणि पारदर्शक प्रणाली आवश्यक आहे. डिजिटल देखरेख, मर्यादित मानवी हस्तक्षेप आणि उत्तरदायित्व असणाऱ्या प्रणाली अनिवार्य केल्या पाहिजेत. राष्ट्रीय चाचणी संस्था आणि इतर परीक्षा संस्थांच्या कामकाजाचे नियमित स्वतंत्र लेखापरीक्षण ऑडिटही केले गेले पाहिजे.

# वन्यजीव जगतील तरच मानव जीवन वाचणार

आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन विशेष



डॉ. प्रीतम भी. गेडाम
नागपूर

पृथ्वीवरील प्रत्येक जीव आपल्या स्वतंत्र अस्तित्वाने आणि वैशिष्ट्यपूर्ण भूमिकेद्वारे नैसर्गिक समतोल राखण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देतो. अन्नसाखळीतील प्रत्येक घटक आवश्यक आहे, कारण एखाद्या एका जीवाचेही असंतुलन संपूर्ण परिसंस्थेवर परिणाम करू शकते. आजच्या काळात मनुष्याला वगळता इतर सर्व जीव निसर्गसंवर्धनात आपली भूमिका पार पाडत आहेत. स्वच्छ हवा, शुद्ध पाणी आणि पुरेसे अन्न हे सर्वांच्या जीवनासाठी आवश्यक असून ते फक्त पर्यावरण निरोगी आणि संतुलित असेल तरच उपलब्ध होऊ शकते. सूक्ष्मजीव माती सुपीक बनवतात, तर पक्षी आणि वन्यप्राणी बियांचा प्रसार करून नवीन वनस्पती व जंगलांच्या वाढीस मदत करतात. जंगलातील जीव सुरक्षित राहिले तर जंगल हिरवेगार राहते, ऋतुचक्र संतुलित राहते, जलस्त्रोत सुरक्षित राहतात आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण होते. त्यामुळे प्रदूषण कमी होते, रोगांचा धोका घटतो आणि जीवनमान अधिक चांगले होते. प्रत्यक्षात वन्यजीव हे निसगार्चे खरे रक्षक आहेत, कारण पर्यावरणीय समतोल राखण्यात त्यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका असते. मनुष्याशिवाय निसर्ग स्वतःला पुन्हा वेगाने सावरू शकतो; परंतु निसर्गाशिवाय मानवजीवनाची कल्पनाही अशक्य आहे. त्यामुळे निसर्ग आणि वन्यजीवांचे संरक्षण करणे ही आपली सर्वात मोठी जबाबदारी आहे.

प्रत्येक सजीवाला आपल्या नैसर्गिक अधिवासात जगण्याचा अधिकार आहे. मात्र, गेल्या काही दशकांमध्ये वाढलेल्या मानवी हस्तक्षेपामुळे वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्ष मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या संघर्षात दोघांनाही जीवितहानीचा सामना करावा लागतो. स्वातंत्र्यपूर्व काळात राजे-महाराजे आणि इंग्रजांनी मोठ्या प्रमाणावर शिकार केल्यामुळे अनेक वन्यप्राण्यांची संख्या अत्यंत कमी झाली. अनेक प्रजाती कायमस्वरूपी नामशेष झाल्या. वन्यजीवांची झपाट्याने घटणारी संख्या रोखण्यासाठी सरकारने विविध कायदे केले आहेत. आयआयटी बॉम्बे आणि सस्त्रा विद्यापीठातील संशोधकांच्या संशोधनानुसार, २०१५ ते २०१९ या कालावधीत देशात प्रत्येक १ चौ.कि.मी. जंगलवाढीच्या बदल्यात सुमारे १८ चौ.कि.मी. जंगल नष्ट झाले. नैसर्गिक, दाट आणि जुनी जंगले झपाट्याने नाहीशी होत आहेत. हीच परिस्थिती कायम राहिली तर त्या जंगलांमध्ये राहणाऱ्या वन्यजीवांचे अस्तित्व गंभीर संकटात येईल.

देशात वाढत्या शहरीकरणामुळे पारंपरिक शेती कमी होत आहे. शहराजवळच्या खेडोपाडी काँक्रीटची जंगले उभी राहत असून नैसर्गिक जंगले आकुंचन पावत आहेत आणि मानवी हालचाली सातत्याने वाढत आहेत. जंगलाजवळ निसर्गाच्या सानिध्यात फार्महाऊस उभारण्याचा कल वाढला आहे.



विकासाच्या नावाखाली जंगलातून महामार्ग बांधले जात आहेत तसेच जंगलतोड करून उत्खनन सुरू आहे. यामुळे वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास थेट नष्ट होत आहेत आणि वषार्नुवर्षे नैसर्गिक आपत्तींची तीव्रता वाढत आहे.

ज्या जंगलांमध्ये वाघ राहतात, तेथील परिसंस्था अधिक समृद्ध आणि संतुलित असते. वाघ हा केवळ एक वन्यप्राणी नसून संपूर्ण जंगलाचा संरक्षक आहे. त्याच्या अस्तित्वासाठी विशाल, सुरक्षित आणि मानवी हस्तक्षेपापासून मुक्त अधिवास आवश्यक असतो. अशा अधिवासांचे संरक्षण केल्याने असंख्य वन्यप्राणी, वनस्पती, सूक्ष्मजीव आणि संपूर्ण जैवविविधता सुरक्षित राहते. वाघ शाकाहारी प्राण्यांची संख्या नियंत्रित ठेवतो, त्यामुळे वनस्पतींचा अतिवापर टळतो आणि नैसर्गिक समतोल अबाधित राहतो. सुरक्षित जंगले अधिक प्रमाणात कार्बन शोषून घेतात आणि हवामान बदलाचे दुष्परिणाम कमी करण्यास मदत करतात. तसेच दाट जंगले पावसाच्या पाण्याचा प्रवाह नियंत्रित करून पुराची तीव्रता कमी करतात आणि कोट्यवधी लोकांना गोड्या पाण्याचा पुरवठा करतात. त्यामुळे वाघ आणि त्यांच्या अधिवासाचे संरक्षण म्हणजे संपूर्ण पर्यावरणाचे संरक्षण होय. हे संरक्षण मानवजीवन, शेती, जलस्त्रोत आणि भावी पिढ्यांसाठी अत्यंत आवश्यक आहे.

दरवर्षी २९ जुलै रोजी "आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन" साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश संकटग्रस्त मोठ्या मांजरांच्या प्रजाती आणि त्यांच्या नैसर्गिक अधिवासाच्या संरक्षणाबाबत जनजागृती करणे हा आहे. वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी आहे. "वाघ वाचवा, जंगल वाचवा, निसर्ग वाचवा" हा संदेश याच कारणासाठी दिला जातो, कारण वाघ टिकले तरच आपणही सुरक्षित राहू. ही बाब प्रत्येकाने समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. ग्लोबल टायगर फोरमच्या माहितीनुसार, जगभरातील जंगलांमध्ये केवळ ५,६६० वाघ शिल्लक आहेत. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांच्या "भारतातील वाघांची स्थिती: सह-भक्षक आणि भक्ष्य - २०२२" या अहवालानुसार त्यापैकी ३,६८२ वाघ भारतात आढळतात. दरवर्षी रस्ते अपघात, शेतांमधील विजेचा धक्का, उघड्या विहिरीत पडणे आणि अवैध शिकारीमुळे असंख्य वन्यजीवांचा अकाली व दुर्दैवी मृत्यू होतो. विदर्भ (महाराष्ट्र) येथील वृत्तपत्रांमध्ये विशेषतः वाघांच्या मृत्यूच्या घटना वारंवार प्रसिद्ध होत असतात. सातत्याने वाढणारे वाघांचे मृत्यू हे गंभीर चिंतेचे कारण आहे. गेल्या सहा महिन्यांत महाराष्ट्रात २४ वाघांचा मृत्यू झाला आहे. तसेच २०२५ मध्ये मध्यप्रदेशात ५४ वाघांचा, तर महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या माहितीनुसार महाराष्ट्रात ४१ वाघांचा मृत्यू झाला.

वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर यांच्या माहितीनुसार प्रत्येक वाघाच्या अंगावरील पट्ट्यांचा नमुना वेगळा असतो, जसा प्रत्येक माणसाच्या बोटांच्या ठशांचा नमुना वेगळा असतो. मादी वाघीण आपल्या पिल्लांशी संवाद साधण्यासाठी कानामागील पांढऱ्या खुणांचा संकेत म्हणून वापर करते. जगातील निम्म्याहून अधिक वाघ भारतात आढळतात, ही आपल्या देशाच्या समृद्ध जैवविविधतेची मोठी साक्ष आहे. वाघ गुरगुरणे, डरकाळी फोडणे, कण्हणे, फुत्कार काढणे आणि धापा टाकण्यासारख्या विविध आवाजांद्वारे संवाद साधतात. शास्त्रज्ञांच्या मते वाघ सुमारे २० लाख वर्षांपासून पृथ्वीवर अस्तित्वात आहेत. मात्र, गेल्या शंभर वर्षांत मानवी हस्तक्षेप, जंगलतोड आणि अवैध शिकारीमुळे त्यांच्या संख्येत सुमारे ९७ टक्क्यांची घट झाली आहे. त्यामुळे त्यांना संकटग्रस्त प्रजाती मानले जाते. आजही अवैध शिकार हा त्यांच्या अस्तित्वासमोरील सर्वात मोठा धोका आहे. वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर आशियामध्ये त्यांच्या संवर्धनासाठी सातत्याने कार्यरत आहे. २०१६ मध्ये काही भागांत वाघांची संख्या वाढल्याची नोंद झाली असली, तरी दक्षिण-पूर्व आशियात त्यांची संख्या अजूनही घटत आहे.

मनुष्यासारख्या बुद्धिमान प्राण्याकडे आज कायदेशीर अधिकार, प्रगत तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे, शासनव्यवस्था, न्यायव्यवस्था, सोशल मीडिया, नातेवाईक, मित्रपरिवार आणि समाज असे अनेक आधार उपलब्ध आहेत. तरीसुद्धा उच्चशिक्षित आणि जागरूक असूनही अनेक प्रसंगी माणूस स्वतःला असहाय्य आणि फसवला गेल्यासारखे अनुभवतो. स्वतःच्या समस्यांच्या निराकरणासाठी सरकारी कार्यालये, लोकप्रतिनिधी आणि न्यायालयांचे उंबरठे झिजवूनही अनेकदा त्याला समाधानकारक न्याय मिळत नाही. पावसाळ्यात पूर, उन्हाळ्यात दुष्काळ, उष्णतेची लाट आणि पाण्याची टंचाई, हिवाळ्यात धुके, हायपोथर्मिया तसेच विविध नैसर्गिक आपत्ती अशा संकटांना मानवालाही सामोरे जावे लागते. सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध असूनही जर माणूस अशा परिस्थितीत हतबल होत असेल, तर त्याच्या तुलनेत वन्यप्राण्यांची अवस्था किती कठीण असेल, याची कल्पनाही करणे अवघड आहे.

क्षणभर मुक्या वन्यजीवांच्या दृष्टीकोनातून विचार करून पाहूया. त्यांना माणसाकडून कोणतीही अपेक्षा नसते. त्यांना केवळ निसर्गाकडून अन्न आणि पाण्याची गरज असते. मानवी हस्तक्षेप नसल्यास निसर्ग सर्व सजीवांचे पालनपोषण करण्यास पूर्णपणे सक्षम आहे. मग आपणच वन्यजीवांना त्रास देत आहोत का? की वन्यजीव आपल्याला त्रास देत आहेत? वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षाला नेमके जबाबदार कोण? या प्रश्नांचा वेळेवर, संवेदनशीलतेने आणि सखोलपणे विचार करणे आज अत्यंत आवश्यक आहे.

वन्यजीवांचे संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. जंगलांचे संवर्धन, नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण, अवैध शिकारीला आळा, पर्यावरणपूरक विकास आणि निसर्गाविषयी संवेदनशील दृष्टिकोन स्वीकारल्याशिवाय मानव आणि वन्यजीव यांच्यातील समतोल कायम राहू शकणार नाही. वन्यजीव टिकले तरच जंगले टिकतील, जंगले टिकली तरच पर्यावरण सुरक्षित राहील आणि पर्यावरण सुरक्षित राहिले तरच मानवजातीचे भविष्य सुरक्षित राहील. म्हणूनच - "वन्यजीव वाचवा, निसर्ग वाचवा आणि मानवजातीचे अस्तित्व सुरक्षित ठेवा."

- ०८२३७४१७०४१

# चांगले मार्गदर्शन, प्रेरणा व संस्कार देणारा प्रत्येक व्यक्ती आपला "गुरू"

रमेश लांजेवार
नागपूर

प्राचीन काळापासून गुरूच्या स्मरणार्थ आषाढ महिन्यातील "पौर्णिमा"साजरी करण्याची परंपरा गेल्या ५ हजार वर्षांपूर्वीची आहे.त्यामुळेच भारतात गुरूपौर्णिमेला आगळेवेगळे महत्व असल्याचे आपल्याला दिसुन येते. गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने सर्वांनीच गुरू या शब्दाचा मान-सन्मान करने अत्यंत गरजेचे आहे.कारण "गुरू शिवाय ज्ञान नाही"ही म्हण सत्य आहे.गुरू पौर्णिमेचे महत्व जाणून चांगले विचार आचरणात आणायला हवे. गुरूचे महत्व म्हणजे ज्यांच्यापासुन आपल्याला चांगल्याप्रकारची चालना,गुण, शिक्षण, प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रेम,आपुलकी, प्रेरणा, संस्कार जिव्हाळ्याच्या गोष्टी इत्यादींचे जो व्यक्ती चांगले आणि महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करतो तोच आपला खरा गुरु समजायला पाहिजे."आई-वडिल" हे गुरू या परीभाषेपेक्षाही महान आणि मोठे आहेत.जो पर्यंत सुर्य-चंद्र-आकाश-पाताळ आहे तोपर्यंत आई-वडीलांचा मान गुरू पेक्षाही महान आहे आणि राहील यात दुमत नाही.कारण आई- वडीलां समोर सर्वच नतमस्तक होतात आणि व्हायला हवे.

ज्याप्रमाणे संपूर्ण सृष्टी पृथ्वी मातेसमोर नतमस्तक होते.आई मायेचे पांघरूण घालुन मुला-मुलींना लहानाचे मोठे करते तर वडील संपूर्ण कुटुंबाची ढाल बनून कुटुंबाचे रक्षण करण्याचे काम करीत असतो. त्यामुळे आपण नेहमी पहातो की छोटी दुर्घटना घडली तर आपण "आईग" म्हणुन आईला हाक मारतो यावेळी आईच्या रूपात सर्वच धावुन येतात.यामुळे आपले दुःख कमी होते.त्याच्या विपरीत जर मोठी घटना घडली तर आपण "बापरे" म्हणतो.यावेळेस संपूर्ण गाव जमा होवुन वडिलांच्या रूपात धावुन येतो.अशाप्रकारे आई-वडीलांचे नाते किती महान व अनभिज्ञ आहे हे जगात दिसून येते. म्हणजेच या जगात जो आपले पालन-पोषन करतो तो आपला सर्वात मोठा गुरू आहे. वडिलांचे नाते किती महान आहे हे आपण समजू शकतो.त्याचप्रमाणे आपण नेहमी पहातो की आई-वडीलांचा अपमान कोनीही सहन करीत नाही आणि करणार नाही.अशा परिस्थितीत मुलं-मुली तुटून पडतात.यात खरे गुरु-शिष्याचे नाते दिसून येते.म्हणजेच जगाच्या पाठीवर सर्वात मोठे गुरू-शिष्याचे नाते म्हणजे आई-वडिलच! यात मोठा वाटा म्हणजे आई-वडीलांचे मुलांवरील संस्कार व मार्गदर्शन. यातुनच गुरू-शिष्याचा जन्म झाला.आई गुरूची भुमिका बजावुन वटवृक्षाच्या अफाट सावलीत मुलांची जोपासना करते तर वडील याच वटवृक्षाचा पहारेकरी बनुन परिवाराचे जतन व संरक्षण करते व पहाडासारखा उभा रहातो.

मानसाच्या आयुष्यात अनेक उतारा-चढाव येतात, कठीण समस्या येतात, सुख-दुःखाच्या घटना घडतात. याकरीता वेगवेगळ्या मार्गदर्शनासाठी प्रत्येकाला गुरूची आवश्यकता असते.कारण गुरू शिवाय संपूर्ण मार्ग अधुरा असतो.आपण शिक्षणाच्या क्षेत्रात जेव्हा पाय ठेवतो. तेव्हा शिक्षक आपला गुरुच असतो. कारण पुढील आयुष्याचे खरे मार्गदर्शन आपल्याला शिक्षकांपासुन मिळत असते. आपण शाळेतल्या पहिल्या पायरीपासुन तर शेवटच्या पायरीपर्यंत म्हणजे अंतीम शिक्षणापर्यंत शिक्षक आपला गुरूच असतो.कारण यांच्या पासुनच आपल्या बुध्दीमत्तेचा आणि पुढील वाटचालीचा मार्ग मोकळा होतो व आपल्याला पुढील दिशा आणि मार्ग दिसून येतात.त्याचप्रमाणे क्रीडाक्षेत्रात पदार्पण करतांना गुरूची अत्यंत आवश्यकता असते. कारण संपूर्ण क्रीडाक्षेत्राचे भवितव्य आपल्या गुरू विद्येवर अवलंबून असते.त्यामुळे आपण क्रीडाक्षेत्रात नेहमी पहातो की कुशलता, कर्तबगारी, उत्कृष्ट खेळाडू आणि पराक्रमी खेळाडू तयार करतांना गुरू- शिष्याची संपूर्ण कसोटी लावून आपली ताकद झोकल्या जाते. तेव्हाच पीटी उषा, कपिल देव, तेंडुलकर, दारासिंग,खली, मिल्खासिंग, मेजर ध्यानचंद, निरज चोपडा असे अनेक नामांकित व महान खेळाडू गुरूमुळेच तयार झाले आणि होतात सुध्दा.

गुरूच्या परीक्षेत जो-जो पास होतो. तीच शिष्यांकडून गुरू दक्षिणा असते.आपण महाभारत ते रामायणमध्ये गुरू-शिष्याचे काय नाते असते ते आपण जाणतोच. व्दापरयुग, सत्ययुग, कलयुग किंवा कोणतेही युग असो गुरू शिवाय पुढचा मार्ग निघने अवघड असते. याकरीता गुरूची आवश्यकता असने गरजेचे असते.राजकीय क्षेत्राचा विचार केला तर यातही आपल्याला गुरू-शिष्याचे नाते दिसून येते. यातुन राजकीय पुढारी तयार होतात.

आपण पारतंत्र्यात असतांना स्वतंत्र लढा जिंकण्यासाठी क्रांतीकारकांनी आपल्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र्याचा लढा उभा केला.त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात राहून मोकळा स्वास घेवु शकतो. कारण क्रांतीकारकांना गुरूचे मार्गदर्शन योग्य लाभले त्यामुळेच क्रांतिकारक शिष्यांनी भारताला स्वतंत्र मिळवून दिले.त्यामुळे गुरू शिवाय कोणतेही काम होने शक्य नाही. याकरीता कोणतेही क्षेत्र असो अनुभव,ज्ञान,माहीती मिळवण्यासाठी गुरूची तेवढीच आवश्यकता असते.म्हणुनच म्हटल्या जाते "गुरू बिना ज्ञाण अधुरा". त्याचप्रमाणे आपण पुजाअर्चना करतो याचे मुख्य कारण म्हणजे एकाग्रता निर्माण व्हावी.आपण आपले काम फत्ते व्हावे याकरिता देवी-देवता व पुर्वजांची पुजाअर्चना करतो. कारण आपण केलेल्या कार्याला यश प्राप्त झाले पाहिजे. भारत भुमित गौतम बुद्ध, ऋषीमुनी, त्यागी, साधुसंत, थोरमहात्मे, होवुन गेले.

याच्याच पाऊलावर पाऊल ठेवून योगा व व्यायामाच्या मदतीने आपले शरीर सुदृढ आणि निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतो.त्यामुळे आज भारताला योगाच्या बाबतीत विश्र्व गुरू म्हणुन संबोधल्या जाते. त्याचप्रमाणे भारताला विश्र्व शांतीचा गुरू सुध्दा संबोधल्या जाते.कारण जगाच्या पाठीवर शांतीपूर्ण देश म्हणजे भारताची जगात प्रचीती आहे.म्हणजेच आज भारत विश्र्व शांतीचा गुरू असल्याचे दिसून येते.

या संपूर्ण घटनांचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, परंपरा, संपूर्ण धमार्ची जोपासना यामुळेच भारताला विश्र्व गुरू म्हणून संबोधल्या जाते.गुरू पोर्णिमेच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की मुलांनी आई-वडीलांच्या सेवेला,त्यांच्या आज्ञेला व त्यांनी सांगितलेल्या कामाला प्रथम प्राधान्य देवून गुरू-शिष्याच्या नात्याची जोपासना सर्वांनीच केली पाहिजे.आताही भारतात गुरू शिष्याचे नाते अतूट आहे व टिकुन आहे याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, भारतातील अनेक धर्म,जाती-पंथ यांचा एकत्रितपणा यामुळेच आपल्याला गुरु-शिष्याचे नाते अधिक घनिष्ठ असल्याचे दिसून येते.शिष्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ज्यांच्या पासून आपण प्रेरणा घेतो,त्याची अवहेलना कुठेही होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे.यातच शिष्यांची महानता दिसून येईल.

गुरू पौर्णिमेबद्दल एक गोष्ट सांगु इच्छितो की,परीवारापेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही, वडिलांपेक्षा श्रेष्ठ सल्लागार नाही,आई पेक्षा श्रेष्ठ जग नाही,भावापेक्षा श्रेष्ठ भागीदार नाही,बहीनी पेक्षा श्रेष्ठ शुभचिंतक नाही,मित्राशिवाय आयुष्य नाही यात आपल्याला गुरूचा गोडवा कीती महान आहे ते आपल्याला स्पष्ट दिसून येते.म्हणजेच प्रत्येक परीवार गुरूची भुमिका आप-आपल्या परीने पार पाडत असते.त्याचप्रमाणे सर्वांनीच एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की गुरू-शिष्याच्या नात्याला कोणीही कलंकित करणार नाही याचीही काळजी सर्वांनीच घेणे गरजेचे आहे. कारण गुरू-शिष्याच्या नात्यानेच आपण घडतो आणि घडवितो, आपला परिवार घडते व यातुनच देश घडतो."आई माझा गुरु,आई कल्पतरू, सुखाचा सागरू,आई माझी प्रीतीचे माहेर, शांतीचे आगार, मांगल्याचे सार आई माझी". गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने मी सर्वांना विनंती करतो की बदलते हवामान व देशातील वाढते प्रदुषण,ऑक्सिजनचे कमी होत असलेले प्रमाण आणि ग्लोबल वॉर्मिगमुळे वाढणारा धोका रोखण्यासाठी प्रत्येकांनी आपल्या परिसरात किंवा घरी वृक्षारोपण केले पाहिजे.

ज्याच्या परिसरात जागा नसेल त्यांनी एखाद्या कुंडीमध्ये झाड लावुन वृक्षारोपण करायला हवे.कारण वाढते प्रदुषण मानव, जिवजंतू, वन्यप्राणी यांच्यासाठी अत्यंत धोकादायक स्थितीत आहे.त्यामुळे गुरू पोर्णिमेचे औचित्य साधून वृक्षारोपणावर भर दिला पाहिजे व पृथ्वी मातेचे रक्षण केले पाहिजे. गुरूपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# बचाव कार्यासाठी मनपा प्रशासन २४ तास सज्ज

## सखल भागातील नागरिकांनी सावध राहावे महापौर निता ठाकरे यांचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प्रादेशिक हवामान विभागाने नागपूर शहरात विजांच्या गडगडाटासह जोरदार पावसाची शक्यता वर्तविली आहे. यामुळे शहरातील नदी व नाल्याच्या काठावरील वस्तीतील तसेच सखल भागातील नागरिकांनी सावध राहावे व आकस्मिक स्थिती उद्भवल्यास त्वरित शहराचे अग्निशमन विभाग किंवा आपत्ती व्यवस्थापन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन महापौर निता ठाकरे यांनी केले आहे.

मनपाच्या अग्निशमन व आपत्कालीन विभागातर्फे बचाव कार्य करून विविध भागात अडकलेल्या विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. अग्निशमन विभाग व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या जवानांनी तसेच मनपाच्या झोनल स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांनी २४ तास सजग राहावे, असे निर्देशही महापौरांनी दिले आहेत. महापौर निता ठाकरे व आयुक्त डॉ. विपीन यांनी शहरातील अनेक भागांचा दौरा करून परिस्थितीची पाहणी केली व यावेळी प्रशासनाला खबरदारी बाळगत सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या. नदी व नाल्याच्या काठावर वस्ती असलेल्या



नागरिकांनी अधिक सजग राहण्याची आवश्यकता आहे. मनपाच्या अग्निशमन विभागाला वस्त्यांमध्ये पाणी साचल्याची माहिती मिळत आहे. या माहितीच्या आधारावर तात्काळपणे बचाव कार्य सुरू केले जात असल्याची माहिती अग्निशमन अधिकारी दिलीप चव्हाण यांनी दिली.

महापौरांनी अतिवृष्टी सदृश परिस्थिती लक्षात घेत शहरातील सर्व नगरसेवकांना आपआपल्या प्रभागांमध्ये नागरिकांच्या मदतीसाठी सजग व तत्पर राहण्याचे आवाहन केले. विशेष म्हणजे, मुसळधार पावसामुळे हवामान विभागाने अतिवृष्टीचा इशारा दिल्याने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत शाळांना बुधवार २९ जुलै रोजी सुटी जाहीर करण्यात आली आहे.

नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने नागपुरात येलो अलर्टचा इशारा दिला आहे. नागपुरात २८ जुलै ते ३१ जुलैपर्यंत जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.आज दुपारी केवळ तीन तासामध्ये शहरात



मुसळधार पाऊस कोसळला. पुढील काही दिवस हवामान खात्याने जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. ही शक्यता लक्षात घेऊन नागपूर महानगरपालिका अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभागाने स्थितीचा आढावा घेतला. शहरात काही भागात पाणी साचल्याने तेथील नागरिकांना सुखरुप बाहेर काढण्याचे काम पूर्ण करण्यात आले. शहरातील सर्व झोनच्या अधिकाऱ्यांनी अहोरात्र सजग राहण्याची आवश्यकता असल्याचे निर्देश महापौर निता ठाकरे व आयुक्त डॉ. विपीन यांनी दिले.

महापौर निता ठाकरे यांनी नरसाळा, हुडकेश्वरसह शहरातील अनेक ठिकाणी प्रत्यक्ष भेट देत नागरिकांशी संवाद साधत परिस्थिती जाणून घेतली. याशिवाय उपमहापौर लिला



हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, मनपा आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त अंकित, मुरुगानंथम एम., मुख्य अभियंता लीना उपाध्ये, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार यांच्यासह झोनचे सर्व सहायक आयुक्त, कार्यकारी अभियंता यांनी देखील प्रत्यक्ष विविध ठिकाणी भेट देत परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी सहकार्य केले.

**विद्यार्थ्यांना सुरक्षित बाहेर काढले**

खामला भागातील सोमलवार शाळेच्या आवारात तसेच रस्त्यावर पाणी साचल्याने शाळेतील विद्यार्थांना मनपाच्या अग्निशमन विभागाच्या जवानांनी दोराच्या सहाय्याने अडकलेल्या विद्यार्थ्यांना सुखरुपपणे बाहेर काढण्याचे बचाव कार्य यशस्वीपणे पार पाडले.

### सीओसीद्वारे परिस्थितीवर नजर

मनपाच्या मुख्यालयात असलेल्या श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी सिटी ऑपरेशन सेंटर (सीओसी) २४ तास कार्यान्वित आहे. येथून शहरातील सर्व परिस्थितीवर नियंत्रण ठेवले जात आहे. तसेच बचाव पथकाला निर्देश दिले जात असल्याची माहिती मुख्य अग्निशमन अधिकारी तुषार बारहाते यांनी दिली. पाण्याची पातळी वाढल्यास किंवा आकस्मिक स्थिती उद्भवल्यास नागरिकांनी अग्निशमन विभागाच्या नियंत्रण कक्षातील ८८५६०-२३३२२ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महापौर निता ठाकरे यांनी केले आहे. नागपूर मनपाने प्रत्येक झोन कार्यालयामध्ये सुद्धा आकस्मिक सेवा देण्याची व्यवस्था केलेली आहे.

यादरम्यान मनपाच्या स्थायी समिती सभापती श्रीमती शिवानी दाणी वखरे या प्रत्यक्ष उभ्या राहून अडकलेल्या मुलांना सुखरूप बाहेर काढण्यात मदत केली. यावेळी त्यांनी पालकांशी संवाद साधून व्यवस्थेची माहिती त्यांना दिली.

त्याचप्रमाणे नरेंद्रनगरातील एका शाळेत पाणी साचल्याची सूचना अग्निशमन विभागाला मिळाली. ही सूचना मिळाल्यानंतर अग्निशमन विभाग व आपत्ती व्यवस्थापन विभागाचे जवान तात्काळपणे तेथे पोहोचले व बचाव कार्य सुरू केले. अंबाझरी जैवविविधता पार्क येथे अडकलेल्या नागरिकांना राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या मदतीने सुखरूप बाहेर काढण्यात आले.

थोडक्यात

### पेपरफुटी प्रकरणातील दोषीवर कडक कारवाही करून तिरंगी यात्रा







**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित असलेल्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणामधे अनेक विद्यार्थी मानसिक नैराश्यात गेले असुन काही विद्यार्थ्यांनी आपले अमूल्य जीवन संपविले ही अत्यंत वेदनादायी आणि दुर्दैवी बाब आहे. तसेच या प्रकरणात न्याय मिळावा, दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे संरक्षण व्हावे, या मागण्यांसाठी जंतर-मंतर येथे शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या बिद्यार्थ्यांवर करण्यात आलेला लाठीचार्ज हा लोकशाही मूल्यावर आघात असून आम्ही त्याचा तीव्र निषेध करण्यात आला.

वरील तातडीने दखल घेऊन नीट पेपर फुटीसारखा प्रकार परत न घडावा ब पेपर फुटी प्रकरणातील दोषीवर कडक कारवाही करून युवकांना न्याय मिळण्यात यावे ही करीता तहसीलदार यांना माजी मंत्री राजेंद्र मुळक रश्मीताई बर्वे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष, यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले. यावेळी राजू कुसुबे माजी सभापती श्रीधर झाडे, अशोक चिखले, सलीम बघाडे, बबिता बर्वे, रुबीना बाघाडे,अर्चना भोयर, शुभांगी तरार,विरेंद्र गजभिये, डुमण चकोले, डॉ. इरफान अहमद,आशिष भड, वैभव खोब्रागडे, निखिल पाटील, गौरव भोयर, सुहास कापसे,चेतन देशमुख, दिपक भोयर, इंद्रपाल गोरले, प्रदिप दियेवार, सचिन सोमकुवर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### वर्धमान नगरातील फील द बर्न फिटनेस शाखेचे गडकरींच्या हस्ते उद्घाटन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरकरांना जागतिक दर्जाच्या फिटनेस सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने फील द बर्न फिटनेसच्या अत्याधुनिक व प्रीमियम वर्धमान नगर शाखेचे उद्घाटन केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी नागपूर पूर्वचे आमदार कृष्णा खोपडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. भंडारा रोडवरील मेहता पेट्रोल पंपासमोर उभारण्यात आलेल्या सुमारे ७ हजार चौरस फूट क्षेत्रफळाच्या या आधुनिक जिममध्ये जागतिक दजार्ची प्रीमियम फिटनेस उपकरणे, अनुभवी प्रशिक्षक, अत्याधुनिक सुविधा, आईस बाथ, स्टीम रूम तसेच आकर्षक इंटेरिअरसह सर्वसमावेशक फिटनेस अनुभव उपलब्ध करून देण्यात आला आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी तसेच मुलांसाठीही ही सुविधा विशेष उपयुक्त ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. उद्घाटनप्रसंगी शिला विष्णूगोपाल जयस्वाल, आशिष व प्रिया जयस्वाल, अभिषेक व अंकिता जयस्वाल, तसेच स्वस्तिक, आरव आणि आद्विका यांची प्रमुख उपस्थिती होती.

'फील द बर्न फिटनेस'चे संस्थापक आशिष जयस्वाल व अभिषेक जयस्वाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'फिट इंडिया मिशन'ला पाठिंबा देत नागपूरमध्ये दजेर्दार फिटनेस संस्कृती रुजविण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, सहा वर्षांपूर्वी साखरदरा येथे सुरू झालेल्या पहिल्या शाखेला १,००० हून अधिक सदस्य असून दररोज सुमारे ५०० नागरिक नियमित व्यायामाचा लाभ घेत आहेत. वर्धमान नगर येथील ही त्यांची दुसरी शाखा असून नागपूरकरांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला नवी दिशा देण्याचे उद्दिष्ट आहे. अभिषेक जयस्वाल हे व्यापारी आघाडी दक्षिणचे अध्यक्ष असून उद्घाटन सोहळ्यास व्यापारी आघाडीचे पदाधिकारी, सदस्य, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. अशी माहिती व्यवस्थापक कुलदीप चिकाणे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

### हातला येथे बुध्द भीम गीतांचा जलसा कार्यक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नुकताच साखळी सुलतान बहुउद्देशीय संस्था, स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय आणि समता बहुउद्देशीय संस्था यांच्या सयुक्त विद्यमाने भगवान बुध्द यांचे प्रतिमेच्या स्थापना निमित्य प्रयास बुध्द विहार हातला येथे बुध्द भीम गीतांचा जलसा कार्यक्रम पार पडला.उदघाटक पुतळा सम्राट नितीनजी तायवाडे,अध्यक्ष राजुजी वानखेडे,सचिव मंजुळाबाई वानखेडे बहुउद्देशीय संस्था काटोल प्रमुख अतिथी प्रा. रवींद्र सोमकुंवर, सचिव समता बहुउद्देशीय संस्था, सामाजिक कार्यकर्ता सतीश खडसे, उपस्थित होते.कार्यक्रमात बुध्द भीम गीतांचा मोठ्या प्रमाणात गायण करून त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्यात आला.या कार्यक्रमात ज्योत्सना धवराळ, वैशाली ढोणे, लता जाधव, आशा मेंढे, निर्मला ढोणे, अनिता ढोणे, कल्पना चक्रपाणी, निर्मला मेश्राम, मंगला ढोणे, जिजा ढोणे, दुर्गा राऊत, सीमा वानखेडे व इतर कलावंतानी उत्कृष्ट गायण करून रसिकानकांचे मन जिकूंन जनजागृती केलीत.कार्यक्रमाचे संचालन सोमकुवर मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वी करिता सोमकुवर यांनी अथक परिश्रम घेतले.

### पूर्णब्रह्म अभियानांतर्गत बुटीबोरी येथील वृद्धाश्रमांना अन्नधान्याचे गुप्तदान





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान, नागपूरच्या 'पूर्णब्रह्म अभियान' या सामाजिक उपक्रमांतर्गत बुटीबोरी येथील दोन वृद्धाश्रमांना अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंचे गुप्तदान करण्यात आले. "कोणीही उपाशी झोपू नये" या उदात्त भावनेतून राबविण्यात येणाऱ्या या अभियानाचा उद्देश गरजू, वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मदत करणे हा आहे. ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान, नागपूर आणि अमरनगर ज्येष्ठ नागरिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडला.

प्रतिष्ठानचे सचिव राजू मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपक्रमाचे अध्यक्ष सुरेश उरकुडे यांच्या प्रोत्साहनाने अमरनगर ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष देवीदास आगरकर यांनी साथ फाउंडेशनद्वारे संचालित वृद्धाश्रम, बुटीबोरी तसेच स्वर्गीय भैय्याजी गुर्जर पुनर्जन्म आश्रम, बुटीबोरी येथे संचालक प्रयाग डोंगरे यांच्या माध्यमातून अन्नधान्याचे गुप्तदान केले. या उपक्रमात प्रकाश ढोले, रामेश्वर कांबळे, गोपाल सोरते, विनोद हिरुरकर, अरुण कोहाड, रामकृष्ण बांगडे, मोहन धवल, मंदिर समिती, विजय लांजेवार, रासेकर, ज्योती नागपूरकर, रामभाऊ चव्हाण, श्री. लहूकर आदींसह अनेक सभासदांनी अन्नधान्य व इतर आवश्यक साहित्याचे योगदान दिले. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. निंबाळकर, डॉ. राजेश कुऱ्हाडे, वसंतराव इझनकर, रमेश जिल्हारे, विलास वाकडे, श्री. भोयर तसेच सर्व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

# AIAPGET-2026 साठी इंटर्नशिपची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबरपर्यंत वाढ

## NIMA Students Forum Maharashtra च्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई/नागपुर**

NIMA Students Forum Maharashtra यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा, निवेदने आणि प्रत्यक्ष चर्चेच्या माध्यमातून AIAPGET-२०२६ परीक्षेसाठी इंटर्नशिप पूर्ण करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ वरून ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

महाराष्ट्रासह देशभरातील २०२०-२१ BAMS, BHMS, BUMS बॅचच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश कोविड-१९ महामारीमुळे विलंबाने झाले होते. परिणामी त्यांच्या शैक्षणिक वेळापत्रकात बदल होऊन इंटर्नशिपही उशिरा पूर्ण होणार होती. त्यामुळे हजारो विद्यार्थी AIAPGET-२०२६ परीक्षेसाठी अपात्र ठरण्याची शक्यता निर्माण झाली होती.

विद्यार्थ्यांच्या या गंभीर समस्येची दखल घेत NIMA Students Forum Maharashtra यांनी



NCISM, आयुष मंत्रालय आणि ठळअ यांच्याकडे सातत्याने निवेदने सादर केली. तसेच NCISM चे Chairperson (डॉ.मनीषा कोठेकर) यांच्यासोबत प्रत्यक्ष भेट घेऊन विद्यार्थ्यांची बाजू प्रभावीपणे मांडण्यात आली. या सकारात्मक पाठपुराव्याची दखल घेत NCISM ने विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून AIAPGET-२०२६ साठी इंटर्नशिप पूर्ण करण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील १० हजाराहून अधिक तसेच देशभरातील ३० हजार पेक्षा जास्त BAMS, BUMS, BHMS विद्यार्थ्यांना AIAPGET-२०२६परीक्षेसाठी पात्रता मिळणार असून त्यांचे एक महत्त्वाचे शैक्षणिक वर्ष वाचले आहे.

या विद्यार्थ्यांच्या हितासाठी नेतृत्व व समन्वय NIMA Students Forum a चे पदाधिकारी डॉ.संकेत अण्णाजी झाडे (अध्यक्ष-महाराष्ट्र), डॉ.कृष्णा चलागे (सचिव) आणि डॉ. योगेश उदगीकर (कोषाध्यक्ष) यांनी केले. विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने पाठपुरावा करून हा महत्त्वपूर्ण निर्णय घडवून आणण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका राहिली.

या संपूर्ण पाठपुराव्यात डॉ.आशुतोष कुलकर्णी (NIMA केंद्रीय अध्यक्ष), डॉ. टेंभुर्णीकर (माजी NIMA केंद्रीय अध्यक्ष), डॉ.राजू तातेवार (NIMA महाराष्ट्र राज्य अध्यक्ष), डॉ.प्रशांत देशमुख (महासचिव), डॉ.सोपान खर्चे (कोशाध्यक्ष- निमा महाराष्ट्र), डॉ. गजानन पडघन (केंद्रीय उपाध्यक्ष), डॉ. शैलेश निकम (केंद्रीय उपाध्यक्ष), डॉ.रविंद्र बोथरा (नागपूर), डॉ.शैलेंद्र अग्रवाल (नागपूर), डॉ. सागर कारंडे आणि डॉ.श्रीराम रगड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, व्यावसायिक आणि न्याय्य हक्कांसाठी भविष्यातही अशाच प्रकारे ठामपणे कार्यरत राहील. असे महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ.संकेत अण्णाजी झाडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# श्री विठ्ठल-रखुमाई मंदिर प्रभादेवीकरांचे श्रद्धास्थान : नगरसेवक निशिकांत शिंदे

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

जुन्या चाळी आणि वाड्या ही मुंबईची खरी ओळख गगनचुंबी टॉवर्समुळे संपत आली असली तरी १२७ वर्षांचे प्रभादेवी येथिल श्री विठ्ठल रखुमाई मंदिर तीच जुनी भक्ती परंपरा अजूनही जोपासून आहे. चार पिढ्यांना वारकरी परमार्थ साधला त्या ठिकाणी मला महापूजा करता आली हे माझे भाग्य आहे असे भक्तिपूर्ण उदगार नगरसेवक निशिकांत



शिंदे यांनी काढले.

यावेळी मूळ प्रभादेवीकर सुप्रसिद्ध उद्योजक चेतन खाटपे आपल्या संपूर्ण परिवारासह उपस्थित होते. त्यांच्याकडून शेकडू वारकऱ्यांना फराळ वाटप करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे आषाढी एकादशी निमित्त हजारो वारकरी या मंदिरात येत असतात, अशा मंदिरात श्री विठ्ठल रखुमाई यांची महापूजा शिंदे दाम्पत्यांच्या हस्ते करण्यात आली होती. ज्येष्ठ गायक दिलीप आणि संतोष गोळपकर यांनी सुश्राव्य भक्तिगीतांचा कार्यक्रम केला. ह. भ. प. शिवाजी महाराज मालुसरे यांचे प्रवचन आणि ह. भ. प. कृष्णामास्तर घाडगे यांचे पंढरी महात्म्य आणि आषाढी एकादशी महत्व वर्णन करणारे कीर्तन झाले.

आमदार महेश सावंत, आमदार सुनील शिंदे, माजी आमदार सदा सरवणकर, माजी आमदार नितीन सरदेसाई, माजी आमदार आणि माजी महापौर विशाखा राऊत, ज्येष्ठ नगरसेवक आशिष चेंबूरकर, माजी नगरसेवक समाधान सरवणकर, माजी नगरसेवक संतोष धुरी, भाजपाच्या महिला नेत्या अक्षता तेंडुलकर, डॉ. भूषण नागवेकर, शाखाप्रमुख संजय भगत, शैलेश माळी, शैलेश पाटील, संतोष तेलवणे, उपविभाग प्रमुख कैलास पाटील, उद्योजक राजाभाऊ जाधव यांचा परिवार, माजी नगरसेविका ज्योतीताई भोसले, शिंदेसेनेच्या प्रिया सरवणकर यांच्यासह अनेक क्षेत्रातील मान्यवर पांडुरंगाच्या दर्शनासाठी आले होते. गुरूवर्य ह. भ . प. रामदादा घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली निलेश केसरकर, विष्णु सकपाळ, विठोबा केसरकर, सुरेश घाडगे, विनायक घाडगे, कैलास घाडगे, पुजारी प्रवीण तोडणकर, हेमंत सकपाळ, गोविंद पवार, विजय करनाळे, गणेश अहिरे, नारायण केसरकर, तुकाराम घाडगे, शुभम केसरकर, राज केसरकर, निवृत्ती मेस्त्री यांनी विशेष मेहनत घेतली.

थोडक्यात

## विजय गजभिये यांचा उमरेडला अमृत महोत्सवी जन्मदिवस सोहळा थाटात



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड / नागपूर**

कर्मनिष्ठ समाजसेवक विजय गजभिये यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी जन्मदिवसानिमित्त आयोजित भव्य सत्कार सोहळा प्रेरणा सेलिब्रेशन लॉन, उमरेड येथे उत्साहात पार पडला. यावेळी मान्यवरांचा सत्कार, विचार प्रतिष्ठान स्मरणिका विशेषांकाचे प्रकाशन तसेच विजय गजभिये यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रफितीचे लोकार्पण उमरेडमध्ये १९ जुलै रोजी, प्रेरणा सेलिब्रेशन लॉन व हॉल गिरड रोड उमरेड येथे थाटामाटात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते विकास जागेश्वर सिर्सीकर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार अभिजीत वंजारी, माजी खासदार प्रा. डॉ खुशाल बोपचे, देविदास घोडेस्वार, नगराध्यक्ष प्राजक्ताताई कारु, माजी सरकारी वकील अनुराधा तायवाडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी विजय गजभिये यांच्या सामाजिक, शैक्षणिक व जनसेवेतील योगदानाचा गौरव करण्यात आला.

विविध संस्था, संघटना आणि नागरिकांनी त्यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व गौरवपत्र देऊन सत्कार केला. कार्यक्रमात केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत हा अमृत महोत्सवी सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. संयोजन समितीचे प्रमुख डॉ. कृष्णा बेले यांनी विशेषकांच्या बाह्य व अंतरंगावर मार्मिक भाष्य करून सर्वांप्रती ऋण निर्देश व्यक्त केले हे विशेषः याप्रसंगी त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या मंडळीचे मोलाचे सहकार्य लाभले. आणि शेकडो उपस्थितांनी सोहळ्याला उपस्थिती दर्शविली व कार्यक्रमाची शोभा वाढवली. सत्कारमूर्ती गजभिये अमृत महोत्सवी जन्मदिवशी सोहळ्याप्रसंगी प्रास्ताविक मायाताई मेश्राम यांनी केले तर संचालन प्रा. रमेश पिसे यांनी केले आणि सरते शेवटी सत्कारमूर्ती विजय गजभिये यांनी सर्वांचे अत्यंत मार्मिक व भावुक आपले मनोगत व्यक्त केले. आणि संजीवनी बागडे हिने सर्व उपस्थितांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.

## नागपूर पोलीस हेल्थ मिशनच्या पहिल्या टप्प्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

### लकडगंज पोलीस ठाण्यात ९० हून अधिक पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भोंगळे चॅरिटेबल फाउंडेशन, आय. एफ. पी. डब्ल्यू.डी., सिक्स सिग्मा आणि इंडियन मेडिकल असोसिएशन नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या 'नागपूर पोलीस हेल्थ मिशन' या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत लक्कडगंज पोलीस ठाण्यात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या शिबिरात ९० हून अधिक पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत रक्तशर्करा (ब्लड शुगर), हिमोग्लोबिन तसेच सर्वसाधारण आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. या शिबिराला पोलीस उपायुक्त (परिमंडळ-३) राहुल मदने यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच परिमंडळ-३ अंतर्गत येणाऱ्या विविध पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षकही यावेळी उपस्थित होते. पोलिसांच्या आरोग्य संवर्धनासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

याप्रसंगी भोंगळे चॅरिटेबल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शालिग्राम भोंगळे, कोषाध्यक्षा डॉ. प्रीती भोंगळे आणि सचिव यश भोंगळे उपस्थित होते. तसेच आयएमए जेडीएनचे राज्य सहसंयोजक डॉ. सुयश, राज्य सहसचिव डॉ. बलजित, नागपूर चेअरमन डॉ. चिन्मय, महासचिव डॉ. लोकेश तसेच मोफत पॅथॉलॉजी सेवा उपलब्ध करून देणाऱ्या मिठास हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेडचे विवेक यांनीही शिबिरात सहभाग नोंदविला. या आरोग्य शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी लक्कडगंज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकुंद कावडे आणि त्यांच्या संपूर्ण पथकाने उत्कृष्ट नियोजन व सहकार्य केले. पोलिसांच्या आरोग्याची नियमित काळजी घेण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या 'नागपूर पोलीस हेल्थ मिशन' अंतर्गत भविष्यात शहरातील इतर पोलीस ठाण्यांमध्येही अशाच स्वरूपाचे मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## साई दत्त पीठा गुरूपौर्णिमा उत्सवाचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दरवर्षी प्रमाणे यंदाही साई दत्त पीठातर्फे दि २९-०७-२०२६ रोजी श्री दत्त मंदिर गजानन नगर, इलेक्ट्रॉनिक्स झोन,हिंगणा रोड नागपूर येथे



गुरूपौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २९ जुलै रोजी सकाळी १० वाजता श्रींची प्राणप्रतिष्ठा आणि षोडशोपचार पूजा तसेच गुरू पूजनाचा कार्यक्रम होईल.दुपारी १२ वाजता महाआरती होईल. महाआरती नंतर १२.३० ते २.० वाजेपर्यंत श्री गजानन नगर महिला मंडळाच्या भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.त्यानंतर प्रसादाचे आयोजन केले आहे. या संपूर्ण कार्यक्रमाला सर्व दत्त भक्तांनी तनमनधनाने सहकार्य करावे आणि उपस्थित रहावे, प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन साई दत्त पीठातर्फे करण्यात आले आहे.

# काटोलात जंगली डुकराचा नागरिकांवर हल्ला

### रानटी डुकरांच्या हल्ल्यात गंभीर जखमीला आर्थिक मदत द्यावी, शहरात येणाऱ्या रानटी डुकरांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी





**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

स्थानिक विजय देशमुख ले-आऊट,जानकी नगर येथील रहिवासी प्रदीप निळकंठराव येवले (वय ६२) यांच्यावर वस्तीत राहत्या घरा परिसरात २६ जुलै रोजी रात्री आठ वाजताच्या सुमारास रानटी डुकराने अचानक हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली. यामुळे राहिवासी धस्तावले आहे. हल्ल्यात येवले यांच्या पोटावर व मांडीवर गंभीर जखमा झाल्या असून त्यांच्यावर नागपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर विजय देशमुख ले आऊट,जानकी नगर परिसरातील नागरिकांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद काटोल तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी, काटोल यांना मंगळवारला निवेदन सादर करून जखमींना तातडीने आर्थिक मदत देण्याबरोबरच नगरीत येणाऱ्या जंगली डुकरांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, विजय देशमुख ले आऊट, जानकी नगर परिसरात जंगली डुकरांचा मोठ्या प्रमाणात वावर असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.परिसरात दहशत पसरली आहे. यापूर्वीही अनेक नागरिकांना या डुकरांमुळे त्रास सहन करावा लागला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून संबंधित विभागाने तातडीने कारवाई करून रानटी डुकरांचा बंदोबस्त करावा. तसेच, गेल्या तीन वर्षांपासून बंद असलेल्या ओपन स्पेसमधील हायमास्ट लाईटची दुरुस्ती करून परिसरात प्रकाश व्यवस्था सुरू करावी किंवा सोलर पोल बसविण्यात यावेत, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. जखमी प्रदीप येवले यांच्या उपचारासाठी झालेला संपूर्ण वैद्यकीय खर्च शासनाकडून मंजूर करून त्यांना आर्थिक मदत देण्याचीही मागणी करण्यात आली. निवेदन देतांना शेषराव टाकळखेडे, दिलीप वरोकर, अनिल जयवार, किरण डांगोरे आदी उपस्थित होते.

# नर बिबट्याचा मानकानुसार अंत्यविधी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर - जबलपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वर एफडीसीएम अंतर्गत पवनी वनपरिक्षेत्रातील कक्ष क्र. ४२० जवळ दिनांक २७ रोजी रात्री ११.३० वाजेच्या सुमारास एक नर बिबट चा जोरदार वाहनाने धडक दिल्याने घटनास्थळीच मृत्यू झाला. सदर घटनेची माहिती मिळताच पवनी वनपरिक्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी यांनी तातडीने धाव घेऊन घटनास्थळाची पाहणी केली.

मृत बिबट्याचे वय अंदाजे दोन ते तीन वर्ष असून त्याच्या शरिरावर भरधाव वाहनाच्या जोराने धडकेमुळे जखमा दिसून आल्या. दि. २८ रोजी पवनी विक्री आगार येथे सदर बिबट्यावर शासन निर्देशाप्रमाणे अंत्यविधी करण्यात आला. मानद वन्यजीव रक्षक अजिंक्य भटकर, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाचे प्रतिनिधी मंदार पिंगळे, गोरेवाडा प्राणी संग्रहालयाचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.श्री.सुजित कोलंघाथ, वन विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक उत्तम सावंत, विभागीय व्यवस्थापक ए आर घाटेकर, वन परिक्षेत्र अधिकारी गजानन केंद्रे, गौरव पाटील व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## नागपूर सुधार प्रन्यासच्या गुंठेवारी विभागातील अधिकारी अनिल राठोड व गुंठेवारी विभागातील कु. दिपाली यांना पदावरून हटविण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अन्याय अत्याचार प्रतिकार संघटनचे संस्थापक अध्यक्ष सुनील मेश्राम यांनी आज पत्रकार परिषदेमध्ये पत्रकारांना सांगितले की, नागपूर सुधार प्रन्यास च्या गुंठेवारी विभागात एक महिन्या पूर्वीपासून अधिकाऱ्यांबद्दल तक्रारी केल्या. परंतु ठोस उत्तर मिळाले नाही. म्हणूनच पत्रकार परिषदेत



न्यायासाठी धाव घेतली. त्यांनी पत्रकारांना सांगितले की, या विभागांमध्ये मनमानी चालू आहे. पैसे देऊन डिमांड नोट काढल्या जाते. पण सामान्य माणसाचे काम होत नाही. एक महिन्याच्या आधी तेथील अधिकारी अनिल राठोड यांना काम करण्यासाठी आम्ही निवेदन दिले होते परंतु त्यांनी अद्यापही काम केले नाही. जोपर्यंत त्यांच्याजवळ पर्यंत पैसे पोहोचत नाही तोपर्यंत डिमांड नोट काढत नाही. असे निदर्शनात आले. त्याच ऑफिस मधली दिपाली नावाची मॅडम आणि निलम नी सामाजिक कार्यकर्ते सुनील मेश्राम यांच्याशी वाद विवाद घातला. तुम्हाला जे काही मनायचे असेल ते अधिकाऱ्यांना म्हणा? आणि पुढे निघा! अशा उद्धट भाषेत सुनावले.

नागपूर सुधार प्रन्यासचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली परंतु त्यावरही ठोस उत्तर मिळाले नाही. संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळल्यावर निमानुसार कारवाई व्हावी तसेच नागरिकांच्या तक्रारीवर वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने निर्णय घेण्याची व्यवस्था सुनिश्चित करावी. यावरील प्रशासनांनी भ्रष्टाचारा विरोधी यंत्रणांनी गांभीर्याने लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी. अशी मागणी सुनील मेश्राम यांनी पत्रपरिषदेत केली. सामान्य माणसाचे काम कसे होईल ? याचा प्रश्न निर्माण होतो आहे. जर अधिकारीच पैशाची डिमांड करत असेल तर यांना या पदावर बसण्याचे काही अधिकार नाही. गुंठेवारी विभागात दिपाली च्या माध्यमातून ठराविक लोकांकडून पैसे घेऊन डिमांड नोट चे काम केल्या जाते. असा आरोप पत्रकार परिषदेत सुनील मेश्राम यांनी केला आहे. याची ठोस कारवाई झालीच पाहिजे व यांना पदावरून हटविलेच पाहिजे, अशी मागणी केली.

# ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाने जलालखेडा भक्तिरसात न्हाऊन निघाले

**आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल नामाने दुमदुमली नगरी; दिंडी, हरिनाम, कीर्तन व महाप्रसादाने भक्तीचा जागर**

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त नरखेड तालुक्यातील जलालखेडा नगरी रविवारी विठ्ठलमय झाली. "ज्ञानोबा-तुकाराम", "पांडुरंग हरी", "विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल" या अखंड नामघोषाने संपूर्ण गाव दुमदुमून गेले. दिंडी, हरिनाम सप्ताह, भजन, कीर्तन, अभंगगायन आणि महाप्रसादाच्या माध्यमातून जलालखेड्यात वारकरी संप्रदायाची परंपरा मोठ्या भक्तिभावात साजरी करण्यात आली.

पहाटे काकड आरतीने धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ झाला. त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात महाअभिषेक, पूजन, हरिपाठ, विष्णुसहस्त्रनाम पठण आणि सामूहिक महाआरती पार पडली. दिवसभर मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली. परिसरातील गावांसह दूरवरूनही अनेक वारकरी



जलालखेड्यात दाखल झाले होते.

टाळ-मृदंग, वीणा, भगव्या पताका आणि तुळशीच्या वृंदावनासह निघालेल्या दिंडीने गावातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण केले. पारंपरिक वेशभूषेतील वारकऱ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यांच्या अभंगांचे गायन करत भक्तिमय वातावरण निर्माण केले. दिंडीवर विविध ठिकाणी ग्रामस्थांनी फुलांची उधळण करून स्वागत केले तसेच पिण्याच्या पाण्याची, सरबताची आणि अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली.

संध्याकाळी झालेल्या हरिकीर्तनात संत साहित्याचा गाभा उलगडत प्रेम, समता, बंधुभाव, सेवा, सदाचार आणि व्यसनमुक्त समाजाचा संदेश देण्यात आला. कीर्तनकारांच्या प्रभावी निरूपणाला उपस्थित भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत टाळ्यांच्या गजरात अभंगांना दाद दिली.

महिलांच्या भजन मंडळांनी अखंड विठ्ठल नामस्मरण करून वातावरण अधिक भक्तिमय केले. युवकांनी दिंडीचे नियोजन, वाहतूक नियंत्रण, स्वच्छता आणि शिस्तीची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. लहान मुलांनी वारकरी वेशभूषा परिधान करून संतांच्या वेशात सहभाग घेतल्याने कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

कार्यक्रमानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत, मंदिर समिती, विविध सामाजिक संस्था, भजन मंडळे आणि ग्रामस्थांनी स्वयंसेवक म्हणून सेवा बजावत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. दिवसभर भाविकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी नतमस्तक होत राज्यात सुख, समृद्धी, चांगला पाऊस, शेतकऱ्यांचे कल्याण आणि सर्वांच्या निरोगी आयुष्यासाठी प्रार्थना केली.

जलालखेड्यातील आषाढी एकादशीचा हा भक्तिमय सोहळा वारकरी परंपरेचे जतन करणारा आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा ठरला. दिवसभर गावात घुमणाऱ्या विठ्ठल नामाच्या गजराने प्रत्येक भाविकाच्या मनात भक्तीची नवी ऊर्जा जागवली.

## इनर व्हील क्लब ऑफ नागपूरतर्फे आषाढी एकादशी उत्साहात साजरी




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इनर व्हील क्लब ऑफ नागपूर आणि लेट कमलताई दवंडे स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशी मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमातून भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संदेश देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात क्लबच्या अध्यक्षा डॉ. पूजा साओजी यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. पीडीसी मीना ताई कुलकर्णी यांनी आषाढी एकादशीचे आध्यात्मिक व सांस्कृतिक महत्त्व अत्यंत प्रभावीपणे सांगत विद्यार्थी व शिक्षकांना श्रद्धा, शिस्त, भक्ती आणि संस्कारांचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अभंग, श्लोक आणि समूहगीताने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शिक्षकांना तुळशीची रोपे भेट देण्यात आली व प्रत्येकाने निसर्गसंवर्धनासाठी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रश्मी काळू यांनी केले, तर आयएसओ अंशू शुक्ला यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी सीसी डॉ. मीनल दवंडे, अर्चना ताई मराठे, लक्ष्मी झा, नीता पुनियानी आणि साधना पाटकी यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षकांचे सहकार्य मोलाचे ठरले. भारतीय संस्कृती, मूल्यशिक्षण आणि पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संगम घडविणारा हा कार्यक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.

# 'कामगिरी नाही, तर पदही नाही!'

### नागपूर जिल्हा कार्यकारिणी बरखास्त, सलील देशमुखांचा संघटनबांधणीचा मोठा निर्णय, निष्क्रिय पदाधिकाऱ्यांना डच्चू, नव्या दमाच्या कार्यकर्त्यांना मिळणार संधी, प्रत्येक तालुक्यात जाऊन साधणार थेट संवाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) च्या नागपूर जिल्हाध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर सलील देशमुख यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी मोठा राजकीय निर्णय घेत विद्यमान नागपूर "जिल्हा कार्यकारिणी तत्काळ प्रभावाने बरखास्त केली आहे. संघटनात्मक पुनर्रचनेच्या उद्देशाने घेतलेल्या या निर्णयामुळे पक्षाच्या जिल्हा राजकारणात एकच खळबळ उडाली असून, निष्ठावान आणि सक्रिय कार्यकर्त्यांना आता मोठी संधी मिळण्याचे संकेत मिळाले आहेत.

या निर्णयाची माहिती सलील देशमुख यांनी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांना अधिकृत पत्राद्वारे दिली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे समजते.

जिल्हाध्यक्षपद स्वीकारल्यानंतर सलील देशमुख यांनी स्पष्ट केले की, पक्षात आता "काम



करणाऱ्यांनाच मान, निष्क्रियांना स्थान नाही," हे धोरण राबविण्यात येणार आहे. केवळ पद मिळवून संघटनेपासून दूर राहणाऱ्या पदाधिकाऱ्यांना यापुढे संधी दिली जाणार नाही. पक्षासाठी सातत्याने मेहनत घेणारे, जनतेच्या प्रश्नांवर लढणारे आणि कार्यकर्त्यांशी कायम संपर्कात असलेले नवोदित चेहरेच नव्या कार्यकारिणीत झळकणार आहेत.

संघटना तळागाळापर्यंत मजबूत करण्यासाठी सलील देशमुख स्वतः जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याचा दौरा करणार आहेत. पक्षाच्या सर्व फ्रंटल संघटनांच्या अध्यक्षांना सोबत घेऊन ते बूथस्तरावरील कार्यकर्ते, गावपातळीवरील पदाधिकारी आणि स्थानिक नेत्यांशी थेट संवाद साधणार आहेत. त्यांच्या सूचना, अडचणी आणि अपेक्षा जाणून घेत नव्या कार्यकारिणीची उभारणी करण्यात येणार आहे.

"पक्षाची खरी ताकद कार्यकर्त्यांमध्ये आहे. पद हे सन्मानासाठी नसून जबाबदारी पार पाडण्यासाठी असते. त्यामुळे कामगिरी, निष्ठा आणि जनसंपर्क या तीन निकषांवरच नवीन पदाधिकाऱ्यांची निवड केली जाईल," असे सलील देशमुख यांनी स्पष्ट केले.

सूत्रांच्या माहितीनुसार, नव्या कार्यकारिणीत युवक, महिला, शेतकरी, विद्यार्थी आणि विविध सामाजिक घटकांना योग्य प्रतिनिधित्व दिले जाणार असून, बूथ ते जिल्हास्तरापर्यंत पक्षाची नव्याने उभारणी करण्यासाठी विशेष कृती आराखडा तयार करण्यात येत आहे. तालुकानिहाय बैठका, कार्यकर्ता मेळावे आणि प्रशिक्षण शिबिरांचेही नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

सलील देशमुख यांच्या या धाडसी निर्णयामुळे पक्षातील निष्क्रिय पदाधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असली, तरी तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये नव्या नेतृत्वाबद्दल उत्साहाचे वातावरण आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटना अधिक मजबूत, शिस्तबद्ध आणि लढाऊ बनविण्याच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल मानले जात असून, नागपूर जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात या निर्णयाची जोरदार चर्चा सुरू आहे.

थोडक्यात

## विद्यार्थ्यांनी घेतला मतदान प्रक्रियेचा अनुभव



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

लोकशाही सुदृढ करायची असेल तर शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना लोकशाही मूल्यांचे बिजारोपण करण्याची आवश्यकता असते. नागरिकशास्त्र विषयात निवडणुकीबाबत शिकवले जाते पण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून लोकशाही पद्धतीने निवडणुकीचे धडे शिकविण्याचा यशस्वी प्रयोग ग्राम विकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मेटपांजरा या शाळेने केला आहे.आज पार पडलेल्या शाळा नायक व नायिका निवडणुकीत विद्यार्थ्यांनी "मतपत्रिकेवर" प्रत्यक्ष मतदान करून आपले प्रतिनिधी निवडले.

या माध्यमातून एश्ट मशीन वापराअगोदर असलेल्या निवडणूक प्रक्रियेची कार्यपद्धती जाणून घेऊन, आज त्या पद्धतीचा प्रत्यक्षात वापर करून भारतीय निवडणूक आयोगाच्या मतदानाचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना घेता आला.या निवडणुकीत वर्ग पाचवी ते बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानानंतर लगेच निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आला व विजयी उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली.याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या डॉ. वैशाली जयंत टालाटुले मॅडम, अजय केचे, नरेंद्र राऊत, प्रशांत मोरे, मंजुषा मदनकर, गणेश जिचकार, प्रवीण किनारकर, विनोद तरटे, अनिल अखंड, नीलकंठ कुकडे इत्यादी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

## आधार युवा प्रतिष्ठान ट्रस्ट लालबाग (तेजुकाया) संस्थेतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

सामाजिक बांधिलकी जपत गेली १५ वर्षे आदिवासी भागातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या आधार युवा प्रतिष्ठान ट्रस्ट लालबाग (तेजुकाया) या संस्थेच्या वतीने नुकतेच पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यातील वेढे, मुरबीपाडा, कोकणपाडा, चितावपाडा आणि करसुड येथील पाच शाळांमधील ३५० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, छत्र्या, खाऊ तसेच जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विशेषतः आदिवासी भागातील मुलांना आवश्यक शैक्षणिक साधने उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.यावेळी संस्थेचे अध्यक्ष विशाल येवले, प्रो कबड्डीपटू विलास माने आणि संस्थेचे सचिव वानेक सदस्य उपस्थित होते.

## आसमान फाउंडेशन तर्फे भोरगड (काटोल) येथील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आसमान फाउंडेशन, नागपूरच्यावतीने काटोल तालुक्यातील भोरगड येथील इंग्रजी माध्यम शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक सत्रानिमित्त शालेय साहित्य, ड्रॉइंग बुक व कलर बॉक्सचे वाटप करण्यात आले. यासोबतच आश्रम शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. यावेळी आसमान फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. रवी गिऱ्हे यांनी भोरगडसारख्या दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत असलेल्या आश्रमशाळा प्रशासनाचे कौतुक करत त्यांचे आभार मानले.

फाउंडेशनतर्फे दरवर्षीप्रमाणे या भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून सहकार्य करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला आसमान फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. रवी गिऱ्हे, सचिव नरेश शेंडे, संचालक दिनेश टेकाडे, आसमान महिला क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षा व फाउंडेशनच्या संचालिका मेघा गिऱ्हे, आश्रमशाळेचे अधीक्षक सुदर्शन पोटोडे, शिक्षकवृंद तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सदगुरु (काकाजी) योगी मनोहर हरकरे विचारधारेतर्फे २९ जुलै रोजी, व्यास पूजन व गुरु पूजन सोहळ्याचे आयोजन बुधवारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



योगी मनोहर विचारधारेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही व्यास पूजन व गुरु पूजन कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी २९ जुलै रोजी, सायंकाळी ५.३० वाजता. करण्यात आले आहे. हा कार्यक्रम विठ्ठल-रुख्माई देवस्थान, साईबाबा बेकरी समोर, इतवारी, नागपूर येथे संपन्न होणार असून, सर्व साधक व भक्तांनी कार्यक्रमाच्या नियोजित वेळेच्या किमान १५ मिनिटे आधी उपस्थित राहावे. अध्यात्म, गुरुसेवा आणि भारतीय संस्कृतीतील गुरु परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या कार्यक्रमास जास्तीत जास्त साधकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# काटोल युवक काँग्रेसला नवे नेतृत्व; मंगेश रामदे यांच्या खांद्यावर संघटन बांधणीची धुरा

### याज्ञवल्क्य जिचकार यांच्यासह कार्यकर्त्यांकडून जल्लोषात स्वागत, युवकांच्या प्रश्नांसाठी आक्रमक भूमिका घेणार

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**



काटोल विधानसभा युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी मंगेश रामदे यांची नियुक्ती करण्यात आल्याने संपूर्ण विधानसभा क्षेत्रातील युवक काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस व नागपूर जिल्हा ग्रामीण युवक काँग्रेसच्या वतीने ही नियुक्ती जाहीर करण्यात आली असून, युवक संघटनेला अधिक सक्षम व गतिमान करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

नागपूर जिल्हा ग्रामीण युवक काँग्रेसचे अध्यक्ष मिथिलेश कान्हेरे यांच्या स्वाक्षरीने नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. युवकांना काँग्रेसच्या विचारधारेशी जोडणे, गावागावात संघटना मजबूत करणे, बेरोजगारी, शिक्षण, शेतकरी कुटुंबातील युवकांचे प्रश्न, स्पर्धा परीक्षा, क्रीडा व कौशल्य विकास यांसारख्या विषयांवर प्रभावीपणे आवाज उठविणे तसेच पक्षाची भूमिका जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

नियुक्तीनंतर मंगेश रामदे यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानत, "काटोल विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक गावात युवक काँग्रेसची संघटना अधिक मजबूत करून नव्या युवकांना पक्षाशी जोडण्यावर भर देणार आहे. सर्वसामान्य युवकांचे प्रश्न शासनापर्यंत पोहोचवून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करू. पक्षाने दिलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी पूर्ण क्षमतेने काम करणार," असा विश्वास व्यक्त केला.

काटोल विधानसभा क्षेत्रात आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि विविध जनआंदोलनांच्या पार्श्वभूमीवर युवक काँग्रेसच्या संघटनात्मक बांधणीला या नियुक्तीमुळे नवी दिशा मिळेल, असा विश्वास पदाधिका ?्यांनी व्यक्त केला. युवकांना नेतृत्वाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष सदस्य नोंदणी अभियान, बूथस्तरावर संघटन विस्तार आणि सामाजिक प्रश्नांवर सातत्याने जनआंदोलने उभारण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

नियुक्तीची घोषणा होताच कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करून व पुष्पगुच्छ देऊन मंगेश रामदे यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस ॲड. याज्ञवल्क्य श्रीकांत जिचकार यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांनी रामदे यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी नईम कुरेशी, ॲड. तेजस केने, मुकेश शेंडे, अजय ठाकरे, चंद्रशेखर राऊत, रवी काकडे, नितीन राय, गौरव पोतदार, भगवान ठोंबरे, करीम शेख, दीपिका डोंगरे, निलेश यावले, चिंटू राठोड, जय सातपुते, सूरज चरपे, अंकुश जुनघरे, करण खंडारे, सूरज काकडे, प्रवीण राजूत, मनीष मेहंगाळे, जयंत केने, वसीम शेख, सुरेंद्र वाघमारे, विनोद काले, प्रवीण कराले, उमेश लाडुकर, सागर लाडुकर, छत्रपती टेटवार यांच्यासह युवक काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नागपूर येथे वृक्षारोपण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



पर्यावरण संवर्धन व हरितक्रांतीचा संकल्प घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नागपूर येथील परीसरात भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विविध प्रकारची झाडे जसे, आवळा, जांभूळ, डाळींब, शेवगा, जांब, सीताफळ इ. झाडे लवण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित सुरेंद्र पवार, व्यवस्थापकीय संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर, प्रसाद कुळकर्णी, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग नागपूर, विजय वाकुलकर, प्रादेशिक उपसंचालक इतर मागास बहुजन कल्याण विभाग नागपूर, डॉ. मंगेश वानखडे, उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर, अतुलकुमार वासनिक, सहाय्यक संचालक, सुखदेव कौरती, जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परीषद नागपूर यांचे हस्ते वृक्षारोपन करण्यात आले.

यावेळी ईशा भूते, सहाय्यक लेखाधिकारी, अनामिका बाराहाते, दिपक कुसरे, मनोहर उचे, छाया बागडे, निलोफर अली, दिनेश सुखदेवे, आरती सुखदेवे, अर्चना सातघरे, सारीका बोरकर, जयश्री धवराळ, प्रिती भांगे, गणेश बच्छे, हेमंत खवशी, विवेक दांडेकर, विवेक गजभिये, गजानन शेळके, अमित कांबळे, चंदन त्रिमले, सुहानी कोवे, प्रतिभा डागोर, वैभव भारती हे प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच क्रिस्टल कंपनीचे सर्व कर्मचारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या उपक्रमाद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवेगार वातावरण निर्माण करण्याचा संकल्प करण्यात आला.

## आमगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांची प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत गगन भरारी

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे अंतर्गत एप्रिल-२०२६ मध्ये घेण्यात आलेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जि.प.प्रा.शाळा, आमगाव शाळेची विद्यार्थीनी कु.किंजल अनिल भागडकर ८२.६६% गुणाने पात्र ठरली.कु.चैताली दिनेश धांडे ७०.६६% गुणाने पात्र ठरली.कु.महेर महेश तुपट ४४.६६% गुणाने पात्र ठरली.शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा माधुरी नखाते यांच्या अध्यक्षतेखाली, मुख्याध्यापक उमाकांत बांगडकर, माजी ग्रामपंचायत सदस्य आनंद नखाते,शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष दिंगाबर ढोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमाचे संचालन वर्गशिक्षक वासुदेव पुसदकर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक उमाकांत बांगडकर यांनी केले. कार्यक्रमाला सारिका भागडकर, महेक तुपट, वैशाली शिवनकर, संगिता ढोरे, आचल धोटे, माला अलोने पालक माता उपस्थित होते. शिष्यवृत्ती परीक्षेत मिळालेल्या यशाबद्दल विद्यार्थी,शिक्षक, पालक आणि शिक्षकांचे खंडविकास अधिकारी सुभाष जाधव गटशिक्षणाधिकारी सुनिल कोडापे, केंद्रप्रमुख चेतना बोबडे यांनी कौतुक करुन समाधान व्यक्त केले.

## गुरुपौर्णिमेनिमित्त श्री बर्फनी दादाजी आश्रमात गुरुपूजन व प्रसाद वितरणाचा कार्यक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त श्री बर्फनी दादाजी आश्रम, पारडी, भंडारा रोड, नागपूर येथे बुधवारी (दि. २९ जुलै) सकाळी ११ ते १२ वाजेदरम्यान गुरुपूजन, आशीर्वाद व महाप्रसाद वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. श्री श्री १००८ योगीराज कायाकल्पी संत ब्रह्मर्षी बर्फनी दादाजी महाराज यांच्या पवित्र चरणी वंदन करून हा धार्मिक सोहळा आयोजित करण्यात येत आहे.

गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरूंचे आशीर्वाद घ्यावेत. शास्त्रानुसार गुरुपूजनाच्या वेळी पती- पत्नीने जोडप्याने सहभागी होणे शुभ मानले जात असल्याने शक्य असल्यास दाम्पत्यांनी एकत्र उपस्थित राहावे, असेही आयोजकांनी नमूद केले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन श्री बर्फनी दादाजी समस्त गुरु परिवार यांच्या वतीने श्री बर्फनी दादाजी आश्रम, पारडी, भंडारा रोड, नागपूर येथे करण्यात आले असून, सर्व भक्तांनी या पवित्र सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नागपूरच्या डॉ. मोतीलाल चौधरी यांना 'नॅशनल बिझनेस एक्सलन्स अवॉर्ड २०२६'

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



नागपूरचे सुप्रसिद्ध रिअल इस्टेट उद्योजक, माई ग्रुपचे प्रमुख तथा माई फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. मोतीलाल चौधरी यांना नवी दिल्ली येथील हॉटेल लीला अँबियन्समध्ये आयोजित नॅशनल लीडरशिप कॉन्क्लेव्ह २०२६ मध्ये 'नॅशनल बिझनेस एक्सलन्स अवॉर्ड २०२६' या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

ग्लोबल एक्सलन्स फोरमच्या वतीने आयोजित या भव्य सोहळ्यात भारतातील विविध राज्यांतील उद्योगपती, उद्योजक, शिक्षण, एव्हिएशन, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि इतर क्षेत्रांतील मान्यवरांसह आफ्रिका, जर्मनी, अमेरिका, युनायटेड किंग्डम, संयुक्त अरब अमिराती (यूएई) आदी देशांतील सुमारे ५०० प्रतिष्ठित व्यक्ती सहभागी झाल्या होत्या. उत्तर प्रदेश सरकारचे कॅबिनेट मंत्री डॉ. रघुवीर सिंह यांच्या हस्ते डॉ. चौधरी यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. मोतीलाल चौधरी यांनी रिअल इस्टेट क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करताना सामाजिक बांधिलकीही जपली आहे.

वयाच्या १९व्या वर्षापासून दरवर्षी वाढदिवसानिमित्त रक्तदान करण्याची परंपरा त्यांनी कायम ठेवली आहे. त्यांच्या माई फाउंडेशनच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिरे, रक्तदाब व मधुमेह तपासणी, दंत व नेत्र तपासणी, गरजूंना मोफत चष्म्यांचे वितरण, होमिओपॅथिक उपचार, वृक्षारोपण, अखंड भारत रॅली, गरजूंना मदत तसेच रोजगारनिर्मिती यांसारखे विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात. त्यांच्या सामाजिक व व्यावसायिक योगदानाची दखल घेत यापूर्वी त्यांना 'समाजाचा गौरव' (२०१८), अमेरिकन ईस्ट कोस्ट विद्यापीठाची मानद डॉक्टरेट (२०२३), महाराष्ट्र उद्योग पुरस्कार (२०२३), इंडियन आयकॉन अवॉर्ड (२०२४), नॅरेडको प्राईड ऑफ रिअल इस्टेट अवॉर्ड (२०२५) आणि भारत सन्मान (२०२५) यांसारख्या प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. 'नॅशनल बिझनेस एक्सलन्स अवॉर्ड २०२६' हा त्यांच्या कार्यातील आणखी एक मानाचा टप्पा ठरला आहे.

या सोहळ्यास केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, पद्मश्री गायक अनुप जलोटा, अरुणाचल प्रदेशचे मंत्री लेओ लिबांग, खासदार डॉ. रवींद्र नारायण बेहरा, इंडियन आयडॉल फेम गायिका श्रेष्ठा शर्मा, गझल गायक कुमार सत्यम, वरिष्ठ आयएएस अधिकारी राजीव रंजन तसेच ग्लोबल एक्सलन्स फोरमचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रवि (जितेंद्रकुमार), अध्यक्ष नईम तिरमीजी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. परिषदेत "विकसित भारत २०४७" या विषयावर देश-विदेशातील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी माई ग्रुपचे प्रकाश बघेले, निलेश बोपचे, शिवकुमार पारधी, जैलाल पटले, उमेश महंत, हिरालाल पराडकर, श्रीकृष्ण तळेगावकर, शेखर अलोणे आदी उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारल्या नंतर डॉ. मोतीलाल चौधरी यांनी या यशाचे श्रेय आई- वडिलांचे आशीर्वाद, गुरुजनांचे मार्गदर्शन, कुटुंबीयांचे प्रेम, माई ग्रुपमधील सहकारी, कर्मचारी आणि मित्रपरिवार यांच्या सहकार्याला दिले.

थोडक्यात

## सकारात्मक संवादाने विश्वास दृढ होतो : संदीप अग्रवाल

'वन लाइफ वन पार्टनर' कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत क्षुल्लक कारणांवरून नात्यांमध्ये दुरावा निर्माण होत आहे. मात्र योग्य वेळी सकारात्मक संवाद साधून पुढाकार घेतल्यास गैरसमज दूर होतात आणि परस्परांतील विश्वास अधिक दृढ होतो. जुनी नाती जपण्याऐवजी सतत नवीन नात्यांचा शोध घेण्याची वाढती प्रवृत्ती मानसिक अस्थिरता आणि कौटुंबिक विसंवादाला कारणीभूत ठरत असल्याची खंत रिलेशनशिप व लाइफ कोच संदीप अग्रवाल यांनी व्यक्त केली.

अखिल भारतीय महिला परिषद, नागपूर शाखा पूर्व विदर्भ महिला परिषदचे कै. अनसुयाबाई काळे स्मृती सदन, न्यू रामदासपेठ येथे रविवारी आयोजित 'वन लाइफ, वन पार्टनर' ही विशेष कार्यशाळा पार पडली. कार्यक्रमाला पूर्व विदर्भ महिला परिषद अध्यक्ष सौ नूतन कोल्हटकर, उपाध्यक्ष सौ अनसुया काळे छाबरानी, सचिव सौ संगीता भावे तसेच सह सचिव प्राजक्ता कुळकर्णी व हेमल चिटणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती. नूतन कोल्हटकर यांच्या हस्ते संदीप अग्रवाल व पूजा अग्रवाल यांचे स्वागत करण्यात आले. नातेसंबंधातील विश्वास, संवाद, एकनिष्ठता आणि भारतीय कौटुंबिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करत संदीप अग्रवाल यांनी आधुनिक जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर बदलत्या नातेसंबंधांवर सखोल मार्गदर्शन केले.

स्त्री आणि पुरुष यांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक जडणघडणीत नैसर्गिक भिन्नता असल्याचे सांगताना त्यांनी परस्परांशी तुलना किंवा स्पर्धा करण्याऐवजी एकमेकांच्या गुणांचा आदर करण्याचे आवाहन केले. भारतीय संस्कृतीत स्त्रीला 'शक्ती'चे स्थान देण्यात आले असून, कुटुंबव्यवस्था ही समाजाची सर्वात मोठी ताकद असल्याचे ते म्हणाले. आधुनिकतेच्या नावाखाली नातेसंबंधांकडे केवळ क्षणिक आकर्षण किंवा मनोरंजनाच्या दृष्टीने पाहण्याची मानसिकता वाढत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. कार्यशाळेदरम्यान उपस्थितांच्या शंकांचे त्यांनी निरसन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संपदा कुळकर्णी पंडित यांनी केले. महिला परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने तरुण मुली तसेच महिलांची कार्यक्रमाला उपस्थिती होती.

## एशियाटिक बिग कॅट सोसायटीचा 'राष्ट्रीय पुरस्कार-२०२६' वितरण सोहळा आज

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते होणार वितरण





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
वन्यजीव शाखा, वन विभाग, महाराष्ट्र आणि एशियाटिक बिग कॅट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनानिमित्त 'राष्ट्रीय पुरस्कार - २०२६'चा वितरण सोहळा बुधवार, २९ जुलै २०२६ रोजी दुपारी १ वाजता आयआयएमच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वन्यजीव संवर्धन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तीन व्यक्तींना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. ५१ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्कार प्राप्त व्यक्तींमध्ये, महाराष्ट्रात वन्यजीव संवर्धन, संरक्षित क्षेत्र व्यवस्थापन, वन्यजीव गुन्हे तपास आणि लोकसहभागावर आधारित संवर्धन या क्षेत्रात २५ वर्षांहून अधिक काळ उल्लेखनीय सेवा देणारे विशाल बनसोड, शाश्वत ग्रामीण विकास, स्वच्छता आणि समाजकल्याणाच्या क्षेत्रात सातारा गावाचे आदर्श गावामध्ये रूपांतर करण्याकरिता झटणारे चंद्रपूर जिल्ह्यातील सातारा ग्रामपंचायतीचे सरपंच गजानन धनराज गुलधे आणि वन्यजीव आणि वनसंवर्धन क्षेत्रात चौदा वर्षांहून अधिक काळ अत्यंत समर्पण, प्रामाणिकपणा आणि व्यावसायिकतेने उल्लेखनीय सेवा देणाऱ्या वनरक्षक व्ही. ए. डोंगरे यांचा समावेश आहे. या कार्यक्रमाला वनमंत्री गणेश नाईक, प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) भा.व.से. एम. श्रीनिवास रेड्डी व इतर वन अधिकारी, एशियाटिक बिग कॅट सोसायटीचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी व सचिव डॉ. अजय पाटील यांची उपस्थिती राहील.

## २९ ते ३१ जुलैदरम्यान राज्यातील विविध भागांत मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाज

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
बंगालच्या उपसागराकडून येणाऱ्या एका कमी दाबाच्या पट्ट्याच्या प्रभावामुळे राज्यातील विविध भागांत २९ ते ३१ जुलैदरम्यान पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. या कालावधीत विदर्भ, उत्तर मराठवाडा, खानदेश, कोकण तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. या कालावधीत विदर्भ, उत्तर मराठवाडा आणि खानदेश मध्ये वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता आहे. तुलनेत मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राच्या दक्षिण भागात कमी पावसाची शक्यता आहे.

या काळात अतिवृष्टीसदृश पावसाच्या घटना घडण्याची शक्यता असल्याने सखल भागांत पाणी साचणे, नदी-नाल्यांना पूर येणे, काही प्रमाणात संरचनात्मक नुकसान होणे, वाहतुकीवर परिणाम होणे, तसेच काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात काही ठिकाणी दरड कोसळण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही.

# वाडी-दत्तवाडीत मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत

### घरांमध्ये, दुकानांमध्ये पाणी शिरल्याने मोठे नुकसान, नागरिकांचा नगरपरिषदेविरोधात संताप




**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**
मंगळवारी दुपारी सुमारे दोन तास झालेल्या मुसळधार पावसामुळे वाडी नगरपरिषद हद्दीतील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. अनेक दुकानांमध्ये पाणी शिरल्याने व्यापाऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. दुकानदार पाणी उपसण्यात व्यस्त असल्याचे चित्र सर्वत्र दिसून आले. तसेच अनेक घरांमध्येही पाणी घुसल्याने अन्नधान्य, कपडे, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक साहित्य व इतर घरगुती वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अवघ्या दोन तासांच्या पावसात वाडीतील अनेक रस्ते जलमय झाले. अनेक ठिकाणी रस्त्यांचे स्वरूप अक्षरशः तलावासारखे झाले होते. खडगाव मोड, सदाचार सोसायटी मोड तसेच अंतर्गत सिमेंट रस्त्यांवरील खडी उखडून खड्डे पडल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. गजानन सोसायटी येथील क्रीडांगणात मोठ्या प्रमाणात पाणी साचून तलावाचे स्वरूप निर्माण झाले. शाहू लेआऊट, दौलतवाडी, मंगलधाम सोसायटी, दत्तवाडी परिसरातील रस्त्यालगतची दुकाने आणि अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली. तलमले गुरुजी यांच्या घरातही मोठ्या प्रमाणात पाणी शिरून घराच्या आतील भागाला तलावाचे स्वरूप आले. त्यामुळे घरातील अनेक संसारोपयोगी वस्तूंचे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच नगरसेवक आनंद कदम आणि ज्योती भोरकर यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून नागरिक व व्यापाऱ्यांशी संवाद साधला. नुकसानग्रस्तांना तातडीने पंचनामे करून शासनाकडून योग्य ती आर्थिक मदत व नुकसानभरपाई देण्याची मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली. दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरासह अनेक भागांमध्ये पाणी साचल्याने नगरपरिषदेची यंत्रणा मदतकार्यात गुंतली होती. मात्र, संपूर्ण शहरात एकाच वेळी झालेल्या मुसळधार पावसामुळे मदतकार्य करताना प्रशासनालाही अनेक अडचणींचा सामना करावा लागला.

नुकसानग्रस्त भागांचे तातडीने सर्वेक्षण करून खराब झालेल्या रस्त्यांची युद्धपातळीवर दुरुस्ती करावी, तसेच आगामी अतिवृष्टीचा धोका लक्षात घेऊन नगरपरिषद प्रशासनाने अधिक सक्षम तयारी करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. विशेष म्हणजे, पावसाळ्यापूर्वी नगरपरिषदेने नालेसफाई पूर्ण केल्याचा दावा केला होता. मात्र, पहिल्याच मुसळधार पावसात अनेक भाग जलमय झाल्याने या कामांच्या गुणवत्तेवर नागरिकांनी तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, नालेसफाई व पावसाळापूर्व तयारीबाबत नगरपरिषदेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

# जि.प. आदर्श वरिष्ठ प्राथमिक शाळा शिवनीच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

### यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळेत पुष्पगुच्छ देऊन सत्कार; शिक्षकांनी केले उज्ज्वल भवितव्यासाठी मार्गदर्शन



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**
जिल्हा परिषद आदर्श वरिष्ठ प्राथमिक शाळा, शिवनी (ता. आमगाव) येथील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. इयत्ता चौथीतील निधी तावाडे तसेच इयत्ता सातवीतील रुबाल फुंडे आणि प्रियांशु गायधने यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवून शाळेचा, पालकांचा व गावाचा नावलौकिक वाढविला. या उल्लेखनीय यशानिमित्त शाळेत विद्यार्थ्यांचा अभिनंदन व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक अनिल अंबुले यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच शिक्षक कृष्णकुमार देशमुख, शालिक यटरे, सुरेश मुधोळकर, अनिता मानकर आणि केमीला चादेवार यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक अनिल अंबुले यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांचे यश हे त्यांच्या मेहनतीबरोबरच शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यांचे फलित आहे. शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देणारी असून अशा स्पर्धात्मक परीक्षांमध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन यश संपादन करावे, असे आवाहन त्यांनी केले. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या जिद्द, नियमित अभ्यास आणि चिकाटीचे कौतुक केले. या यशामुळे शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असून भविष्यात अधिकाधिक विद्यार्थी गुणवत्तेच्या आधारे यशाचे शिखर गाठतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून गावकऱ्यांनी, पालकांनी आणि शिक्षणप्रेमींनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी आशादीपचे कार्य प्रेरणादायी : शिवानी दाणी

### आंतरराष्ट्रीय धावपटू मनीषा कडूकार यांचा स्व. उषा संत पुरस्काराने गौरव



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
दिव्यांगांच्या जिद्द, धैर्य आणि आत्मविश्वासाचे कौतुक करत आशादीप व स्नेहांगण संस्थेचे कार्य प्रेरणादायी आहे. नागपूर महानगरपालिकेतर्फे संस्थेला आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी यांनी दिली.

आशादीप अपंग महिला-बाल विकास संस्था, नागपूरच्या ३३व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित समारंभात आंतरराष्ट्रीय धावपटू मनीषा कडूकार (बागडे) यांना संस्थेचा प्रतिष्ठेचा स्व. उषा संत पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सोबतच, शालेय व महाविद्यालयीन परीक्षांमध्ये तसेच क्रीडा क्षेत्रात विशेष यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पाल्क सामुद्रधुनी पोहून विक्रम करणाऱ्या नागपूरच्या अंध जलतरणपटू ईश्वरी पांडे यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच दृष्टीबाधित विद्यार्थ्यांच्या परीक्षेसाठी मोलाचे सहकार्य करणाऱ्या लेखनिकांचाही सन्मान करण्यात आला.

मातृसेवासंघाच्या रंजन सभागृहात झालेल्या या समारंभाला मातृसेवासंघाच्या सचिव डॉ. लता देशमुख याची विशेष उपस्थिती होती तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आशादीपचे प्रमुख सल्लागार लालासाहेब पाटील होते. डॉ. लता देशमुख यांनी संस्थेच्या सामाजिक कार्याला शुभेच्छा दिल्या तर अध्यक्षीय समारोपात लालासाहेब पाटील यांनी, समाजाने दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी अधिक संवेदनशील व्हावे, असे आवाहन केले. प्रास्ताविकातून संस्थेच्या अध्यक्षा डॉ. प्रतिमा शास्त्री यांनी दिव्यांगांचा समाजात स्वीकार, समावेश आणि सक्षमीकरण हेच संस्थेचे ध्येय असल्याचे सांगितले. सचिव अपर्णा कुळकर्णी यांनी अहवाल सादर केला. मान्यवरांच्या हस्ते आशादीप ई-नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन डॉ. वृंदा जोगळेकर यांनी केले. मानपत्राचे वाचन अपर्णा कुळकर्णी यांनी केले. कार्यक्रमाला विविध दिव्यांग शाळांतील विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि संस्थेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अभिनेते देवेंद्र दोडके यांना यावर्षीचा पद्मश्री मो. रफी अवॉर्ड जाहीर

### संगीतमय पुरस्कार वितरण सोहळा १ ऑगस्ट रोजी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
हिंदी चित्रपटसृष्टीतील अजरामर पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या ४६ व्या पुण्यतिथीनिमित्त मोहम्मद रफी फॅन्स कल्चरल



ऑर्गनायझेशन, प्रगती एंटरप्रायझेस व एम. आर. के संगीत समूह यांच्या संयुक्त विद्यमाने संगीतमय पुरस्कार वितरण सोहळ्याचे शनिवार, १ ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात आले आहे. श्री साई सभागृह, शंकरनगर, नागपूर येथे सायंकाळी ६ वाजता होत असलेल्या या कार्यक्रमात प्रसिद्ध चित्रपट अभिनेते देवेंद्र दोडके यांना यावर्षीचा पद्मश्री मो. रफी अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला महापौर निता ठाकरे, जिल्हा परिषद नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, वनराईचे विश्वस्त डॉ. गिरीश गांधी, सेंट पॉल स्कूलचे संचालक राजाभाऊ टांकसाळे, गेट्वेल हॉस्पिटल अँड रिसर्च इंस्टिट्यूट्स संचालक डॉ राजेश स्वर्णकार, प्रकाश वाघमारे, प्रवीण महाजन, कार्तिक अय्यर, प्रगती एंटरप्राइजेस नागपूरचे संचालक गौरव नासरे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

त्यानंतर सदाबहार गीतांचा कार्यक्रम 'सौ बार जनम लेंगे' सादर केला जाईल. या कार्यक्रमात विनोद दुबे, रमेश अय्यर, राम खनगन, सरिता गडकरी, वैष्णवी सांबरे, सुधा हरिदासन, सुनील फुलझेले, जितेश बनोदे, समीर वझलवार आणि मोहम्मद सलीम हे गायक कलाकार रफी, मुकेश आणि किशोर कुमार यांच्या लोकप्रिय गीतांची मैफल रंगविणार आहेत. कार्यक्रमाची संकल्पना राम खनगन यांची असून आयोजन रमेश अय्यर यांचे आहे. मंचसंचालन मोहम्मद सलीम व रुपाली मोरे-कोंडेवार करतील. या निःशुल्क कार्यक्रमाला संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अजरामर गीतांचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# स्वरवेद फाउंडेशनच्या 'तीर्थ विठ्ठल' अभंगवाणीने ज्येष्ठ रसिक मंत्रमुग्ध

**आषाढी एकादशीनिमित्त भक्तिरसाचा अविस्मरणीय सोहळा**



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
आषाढी एकादशीनिमित्त स्वरवेद फाउंडेशन, नागपूरच्या वतीने आयोजित 'तीर्थ विठ्ठल' या अभंगवाणी कार्यक्रमाने रसिकांना भक्तिरसात चिंब भिजविले. उत्तर अंबाझरी रोडवरील सोहम हॉल, सीनियर सिटिझन होम येथे झालेल्या या कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिक व संगीतप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दिवंगत गायिका स्व. कुसुम चाफळे यांच्या स्मृतीस समर्पित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात 'सा रे ग म' फेम पुण्याच्या गायिका कस्तुरी पायगुडे, अंबरीश जोगळेकर, प्रतिमा रोडी आणि सीमा पिदी यांनी आपल्या सुमधुर आवाजातून विठ्ठलभक्तीने ओतप्रोत भरलेले अभंग आणि भक्तिगीते सादर केली. तीर्थ विठ्ठल, माझे माहेर पंढरी, कानडा राजा पंढरीचा, बोलावा विठ्ठल, पंढरीचे सुख, अवघा रंग एक झाला आणि वेद जया लागी यांसारख्या अजरामर रचनांनी सभागृह भक्तिमय वातावरणाने भारून गेले. कलावंतांना रवी सातफळे यांनी तबल्यावर, प्रतिमा रोडी यांनी हार्मोनियमवर, नचिकेत देव यांनी सिंथेसायझरवर, तर आदित्य पेशवे यांनी लघुवाद्यांवर सुरेल साथ दिली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन विशाखा पवार यांनी केले. मोहन सरवटे व शीलाताई जोशी यांनी कलाकारांचे स्वागत केले, तर सोहमच्या अध्यक्षा वर्षा मनोहर यांच्या हस्ते कलाकारांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी आदित्य अनघा मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक आणि नागपूर नागरिक सहकारी बँक यांचे सहकार्य लाभले.

थोडक्यात

## क्रांतिवीर श्यामलालबाबू श्रीवास स्मृती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने गणवेश वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

क्रांतिवीर श्री श्यामलालबाबू श्रीवास स्मृती बहुउद्देशीय संस्था, श्रीवासनगर महादुला यांच्या वतीने तेजस्विनी माध्यमिक विद्यालयातील गरजू व आर्थिक दृष्ट्या कमजोर असलेल्या विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या वतीने दरवर्षीच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत केल्या जाते. या स्कूल बॅग, शूज ,गणवेश सह इतर शैक्षणिक साहित्याचाही समावेश आहे. संस्थेचे अध्यक्ष राजेश मछले यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव अमरजीत गोडबोले, माजी गटनेता रामबाबू तोडवाल, सामाजिक कार्यकर्ता मनोज सावजी, नगरसेवक प्रीतम लोहासारवा, सामाजिक कार्यकर्ता सचिन पाटील,कोराडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश धुमाळ, उप पोलीस निरीक्षक क्रांती पवार,मुख्याध्यापक दिनकर ठवळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी विद्यालयातील ३० विद्यार्थ्यांना गणवेश वाटण्यात आले. याप्रसंगी अमरजीत गोडबोले, रामबाबू तोडवाल, सचिन पाटील यांचे मार्गदर्शन झाले. पोलीस निरीक्षक गणेश धुमाळ यांनी यावेळी विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्या संदर्भात माहिती दिली. तसेच विद्यार्थिनींसाठी असलेले कायदे पटवून दिले. मान्यवरांच्या हस्ते यावेळी विद्यालयातील सातव्या वर्गाच्या शिष्यवृत्ती मध्ये यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन पर्यवेक्षक शिशुपाल कनोजे यांनी तर आभार नरेंद्र लोही यांनी मानले यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिसर घेतले.

## जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा, नवेगावच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत फडकवला यशाचा झेंडा



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजु फुंडे**

जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा, नवेगाव येथील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेसह गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. या परीक्षेत एकूण ६ विद्यार्थी पात्र ठरले असून त्यांच्या उत्कृष्ट यशामुळे शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये कु. कनक बोपचे हिने ७४% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. त्यानंतर कु. रिया तांडेकर हिने ७२%, कु. रिया रामटेके हिने ७१.३३%, कु. दिपाली लिल्हारे हिने ६९.३३%, वंश बोपचे याने ६५.३३% आणि गौरव बोपचे याने ६०% गुण मिळवून शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले.

शाळा परिवारातर्फे सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन व टाळ्यांच्या गजरात सत्कार करण्यात आला. त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांची जिद्द, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य यांना देण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत नवेगावचे सरपंच मनोज बोपचे, उपसरपंच किशोर लिल्हारे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेश तांडेकर, उपाध्यक्ष पुष्पा बोपचे तसेच समितीचे सदस्य संतोष दमाहे, हौसलाल बोपचे, रेखा पटले, टेकेश्वरी पटले, सुनीता लिल्हारे, योगेश्वरी दमाहे, रीना रामटेके, आशा बोपचे, सरिता बोपचे, केंद्रप्रमुख आर. एच . रहांगडाले यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

शाळेचे मुख्याध्यापक एस. एम. दशरिया, पदवीधर शिक्षक एस. जी. मच्छिरके, पदवीधर शिक्षक राजकुमार बसोने, स्वयंसेवक राकेश दमाहे तसेच स्वयंसेविका साक्षी भंडारी यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत ही कामगिरी इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. शाळा परिवाराने विश्वास व्यक्त केला की, आगामी काळातही विद्यार्थी अशाच प्रकारे उत्कृष्ट यश संपादन करून शाळा, पालक आणि परिसराचे नाव अधिक उज्ज्वल करतील.

## सकल मराठा समाजाचा धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर संविधान चौकात जल्लोष



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सकल मराठा समाजाचा संविधान चौक नागपूर येथे धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर मोठ्या उत्साहात लाडू वाटून जल्लोष करण्यात आला, सकल मराठा समाजाने यापूर्वी २४ मे २०२६ रोजी पासुन धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावी हि मागणी लावुन धरली होती व आंदोलन सुद्धा करण्यात आले होते,नागपूर येथे सुरु असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला सुद्धा समाज बांधवानी पाठींबा दिला, नागपूर येथे आमरण उपोषणावर बसलेले राजकुमार रामटेके यांची सुद्धा समाज बांधवांनी भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करून त्यांना पाठींबा जाहीर केला होता, आज शिक्षमंत्र्यांनी राजीनामा दिल्या नंतर त्यांना लाडू भरऊन त्यांना उपोषण मागे घ्यायला लावले.

विद्यार्थ्यांच्या एकजुटीला यावेळी सलाम करण्यात आला व हिच एकजूट भविष्यात कोणत्याही अन्याय झाला तर अशीच राहो हि भावना व्यक्त करण्यात आली. सकल मराठा समाजा तर्फे या जल्लोष्यात अमोल माने, प्रकाश खंडागळे,स्वप्नील काळे,गजेंद्र जाधव, जनार्दन जगताप, अनुप थोरात, दिलीप मामूलकर तसेच असंख्य मराठा समाज बांधव उपस्थित होते.

# शोरूममधील ४.७८ लाखांच्या कृषी अवजारांची चोरी : चार कर्मचाऱ्यांविरुद्ध रामनगर पोलिसांत गुन्हा

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**




अंजिकर ऑटोमोबाईल शोरूममधून तब्बल ४ लाख ७८ हजार रुपये किमतीच्या कृषी अवजारांची चोरी केल्याप्रकरणी विनयकुमार द्विवेदी (सिक्युरिटी गार्ड), आफताब शौकत शेख (शोरूम ड्रायव्हर), प्रशांत मुरलीधर मद्देलवार (हेल्पर) आणि उमेश अंकुश गेडाम (हेल्पर) यांच्याविरुद्ध रामनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपींनी संगनमत करून दीर्घकाळ शोरूममधील साहित्य चोरी करून त्याची विक्री केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, फियार्दी रोहन चंद्रकांत अंजिकर ३९ वर्ष रा. अरविंद नगर, मूल रोड, चंद्रपूर हे नागपूर रोडवरील अंजिकर ऑटोमोबाईल या शोरूमचे मालक असून तेथे ट्रॅक्टर व कृषी अवजारे विक्रीचा व्यवसाय करतात. शोरूममध्ये अनेक कर्मचारी कार्यरत असून सुरक्षा व्यवस्थेसाठी स्वतंत्र सुरक्षा रक्षकाचीही नियुक्ती करण्यात आली आहे.

२४ जुलै रोजी फिर्यादी यांना त्यांचे मित्र अरुणभाई यांनी फोन करून सुरक्षा ठेकेदार विनयकुमार द्विवेदी हा सेकंड हँड ट्रॅक्टर शोरूममध्ये ट्रॅक्टर फ्रंट गार्ड विक्रीसाठी घेऊन आल्याची माहिती दिली. संबंधित फ्रंट गार्ड स्वतःकडून विकत घेतलेला नसल्याचे अरुणभाईंनी सांगितल्यानंतर त्यांनी दाखविलेल्या छायाचित्रांवरून तो फ्रंट गार्ड अंजिकर ऑटोमोबाईलच्या शोरूममधील असल्याचे स्पष्ट झाले.

यानंतर शोरूममधील साहित्याचा साठा तपासण्यात आला असता, सन २०२५ पासून २७ जुलै २०२६ पर्यंत एक मोठा रोटावेटर, दोन छोटे रोटावेटर, पाच ट्रॅक्टर फ्रंट गार्ड, तीन कल्टीवेटर, स्वराज कंपनीचे आठ ऑइल बकेट (८.५ लिटर) तसेच दहा रोटावेटर ब्लेड बॉक्स असा एकूण ४ लाख ७८ हजार किमतीचा माल कमी असल्याचे आढळून आले.

याबाबत सेल्स एक्झिक्युटिव्ह संदेश चंद्रहास गोवर्धन व सुपरवायझर मनोज चहाकाटे यांच्याकडे चौकशी केली असता, संबंधित चार आरोपींनी संगनमत करून शोरूममधील साहित्य चोरी करून विक्री केल्याची माहिती त्यांनी दिली. त्यानंतर विनयकुमार द्विवेदी याची चौकशी केली असता, रात्री गोदाम बंद झाल्यानंतर टाटा एस वाहनातून तसेच काही वेळा दिवसाही माल बाहेर काढून विक्री केल्याची आणि मिळालेली रक्कम आपसात वाटून घेतल्याची कबुली दिल्याचा उल्लेख फियार्दीच्या तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी रामनगर पोलिसांनी २७ जुलै रोजी आरोपींविरुद्ध कलम ३०६, ३(५) भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास रामनगर पोलीस स्टेशनच्या ठाणेदार प्रभावती एकुरके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कृष्णा दराडे करीत आहेत.

## आषाढी वारी २०२६ची 'ग्रेट इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंद

**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**

महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, भक्तीचा आणि सामाजिक ऐक्याचा जागतिक स्तरावर गौरव करणारी अभिमानास्पद बातमी समोर आली आहे. शतकानुशतके अखंड सुरू असलेल्या आषाढी वारी २०२६ या दिव्य आध्यात्मिक परंपरेची ग्रेट इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये अधिकृत नोंद करण्यात आली आहे. या सन्मानामुळे महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला राष्ट्रीय स्तरावर विशेष मान्यता मिळाली आहे.

दरवर्षी लाखो वारकरी संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांसह "ज्ञानोबा-तुकाराम"चा गजर करत पायी पंढरपूरकडे प्रस्थान करतात. भजन, कीर्तन, हरिनाम सप्ताह, दिंडी, अभंगगायन आणि सेवाभाव यांचा अद्वितीय संगम असलेली ही वारी श्रद्धा, समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणारी जगातील एक आगळीवेगळी आध्यात्मिक परंपरा आहे.




या ऐतिहासिक नोंदीमुळे आषाढी वारीचे सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक महत्त्व अधिक अधोरेखित झाले असून, महाराष्ट्रातील प्रत्येक वारकरी आणि भाविकासाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण ठरला आहे. ही नोंद केवळ एका धार्मिक सोहळ्याचा गौरव नसून, संतांच्या विचारांचा आणि महाराष्ट्राच्या अमूल्य परंपरेचा राष्ट्रीय सन्मान आहे.

"वारी ही केवळ यात्रा नाही, तर ती भक्ती, सेवा, समता आणि मानवतेचा अखंड प्रवाह आहे. ग्रेट इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड्समधील ही नोंद म्हणजे संपूर्ण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा गौरव आहे." असे ग्रेट इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड्स संचालक डॉक्टर इंद्रजीत मोरे यांनी घोषित केले आहे.

## नीट सारखाच एमएच-सीईटीमध्ये महाघोटाळा?

**मुंबई :** देशात झालेल्या नीट पेपरफुटी प्रकरणानंतर अनेक सवाल विद्यार्थ्यांकडून उपस्थित करण्यात आले. अशा स्पर्धा परीक्षांमध्ये होणा-या पेपरफुटीमुळे तरुणांचे भविष्य धोक्यात येते, यासाठी केंद्र सरकारने ठोस पाऊले उचलावीत यासाठी अनेक आंदोलने झाली. यानंतर, आता राज्यातील एमएच-सीईटी परीक्षेच्या निकालावरून नवा वाद निर्माण झाला आहे. काँग्रेसचे नेते सचिन सावंत, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे रोहित पवार यांच्यासह अनेक विरोधी पक्षातील नेत्यांनी एमएच-सीईटी निकालात कथित गैरव्यवहार झाल्याचा आरोप केला आहे.

काँग्रेसचे सचिव सचिन सावंत यांनी सर्वप्रथम एमएच-सीईटीमध्ये कथित घोटाळ्याचा आरोप केला. बारावीत ३५ ते ४० टक्के गुण मिळालेल्या काही विद्यार्थ्यांना एमएच-सीईटी मध्ये ९० ते १०० पर्सेंटाईल कसे मिळाले? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सचिन सावंत यांनी निकालाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. यानंतर, आमदार रोहित पवारांनीदेखील याच मुद्यावरून सरकारवर निशाणा साधला. काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत म्हणाले की, देशभरात नीट पेपरफुटीने विद्यार्थी आणि पालकांची चिंता वाढली आहे.

# आष्टी येथे व्हॉइस ऑफ मिडिया पत्रकार संघटनेची प्रथम बैठक संपन्न

### आष्टी तालुकाध्यक्षपदी ओंकार दंडाळे तर सचिवपदी मधुसदन नागपुरे यांची निवड, राज्य कार्याध्यक्ष नरेंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष सुनील साबळे यांच्या उपस्थितीत पार पडली बैठक

**दै. सिंहवाणी वृत्त, आष्टी (शहीद)**

आष्टी येथे पत्रकारांच्या हक्कासाठी कार्यरत असलेल्या व्हॉइस ऑफ मिडिया पत्रकार संघटनेची आष्टी तालुक्याची बैठक राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी संघटनेत रचनात्मक बदल केल्यानुसार राज्य कार्याध्यक्ष नरेंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय विश्रामगृह येथे आज आयोजित करण्यात आली होती. यामध्ये आष्टी तालुकाध्यक्ष म्हणून दैनिक देशोन्नतीचे साहुर येथील पत्रकार ओंकार दंडाळे यांची सवार्नुमते निवड करण्यात आली.

या आयोजित बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार नरेश उर्फ सोनू भार्गव तर प्रमुख अतिथी म्हणून व्हॉइस ऑफ



मीडिया संघटनेचे वर्धा ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष सुनील साबळे, पत्रकार ओंकार दंडाळे,पत्रकार मधुसूदन नागपुरे मंचावर विराजमान होते.यावेळी मागील कार्यकाळात अध्यक्ष असलेले सुनील साबळे तसेच सचिव संजयसिंह देसाई यांनी दोन वर्षाच्या काळातील आढावा सादर केला.

त्यानंतर नवीन कार्यकारणी गठीत करण्यात आली.यामधे तालुकाध्यक्षपदी सर्वानुमते साहुर येथील दैनिक देशोन्नतीचे पत्रकार ओंकार दंडाळे यांची नियुक्ती करण्यात आली. उपाध्यक्षपदी आष्टी येथील दैनिक नवराष्ट्रचे शहर प्रतिनिधी मंगेश सोनारे यांची निवड करण्यात आली. तर सचिव म्हणून तळेगाव येथील दैनिक महासागरचे पत्रकार मधुसूदन नागपुरे यांची निवड करण्यात आली. संघटनेचे मार्गदर्शक म्हणून दैनिक नवराष्ट्रचे आष्टी तालुका पत्रकार नरेश उर्फ सोनूभाऊ भार्गव यांची नियुक्ती करण्यात आली.

सहसचिव दैनिक वरूड केसरीचे पत्रकार स्वप्निल पोहकार, कोषाध्यक्ष म्हणून साहूर येथील नवराष्ट्रचे पत्रकार गजानन भोरे,संघटक म्हणून दैनिक शहीदभूमी प्रहारचे संपादक संजयसिंह देसाई, प्रसिद्धीप्रमुख दैनिक लोकमतचे आष्टी तालुका प्रतिनिधी अमोल सोटे यांची निवड करण्यात आली.

तसेच कार्यकारणी सदस्य म्हणून दैनिक सकाळचे आष्टी तालुका प्रतिनिधी अनिकेत ठाकरे,दैनिक देशोन्नतीचे तळेगाव प्रतिनिधी निलेश बंगाले, दैनिक नवराष्ट्रचे तळेगाव प्रतिनिधी मयूर वानखडे, दैनिक लोकमतचे आष्टी शहर प्रतिनिधी निलेश कोहळे, साहुर येथील दैनिक सकाळचे पत्रकार दिनेश वरकड,साहुर येथील दैनिक लोकमतचे पत्रकार मंगेश ढवळे, भारसवाडा येथील पुण्यनगरीचे पत्रकार गजानन काळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे सर्वांनी अभिनंदन केले.

## काचुरवाही येथे वृक्षारोपण कार्यक्रम




**दै. सिंहवाणी वृत्त, शुभम कामळे- काचुरवाही**

स्व. ॲड नंदकिशोर जयस्वाल माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय काचुरवाही येथे सामाजिक वनिकरण विभाग नागपूर व परिक्षेत्र रामटेक यांच्या संयुक्त विघमाने केशर जातीचा आंबा, फुले निळकंठ जातीचे जांभूळ आदी जातीची झाडे लावण्यात आलीत. अभियान २०२६२०२६ अंतर्गत २८ जुलै रोजी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा फळझाडांच्या वृक्षारोपणाचा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावर उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन वन परिक्षेत्र अधिकारी रामटेक जितेंद्र ढाले यांच्या संकल्पनेतून आणि कृषि व प्राचार्य सुनील कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात वनपरीक्षेत्र अधिकारी रामटेक जितेंद्र ढाले यांच्या शुभहस्ते करण्यात आली. यावेळी त्यांनी वृक्षारोपण ही केवळ औपचारिकता नसून भावी पिढ्यांसाठी हिरवेगार, समृद्ध आणि पर्यावरणपूरक भविष्य घडविण्याची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन केले. प्रत्येकाने लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प केल्यास पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक प्रभावी होईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी कार्यक्रमास वनपरीक्षेत्र अधिकारी सुनिल हांडे, शेख सर सामाजिक वनिकरण अधिकारी, ढाले सर,प्राचार्य सुनील कोल्हे, शिक्षक संजय बोन्द्रे, माया मुसळे,भारत भोवते, जीवन राऊत,स्नेहा दमाहे,देवराव धुर्वे,वनिता दुधपचारे, प्रगती अडकणे, प्रा, फारुख शेख, विक्रम गजभिये, अंजली चकोले, पंढरी कडू सुप्रिया गजभिये, व शाळा व महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# पुण्यात उत्कर्ष भारत सन्मान सोहळात लेखिका मनीषा कांबळे यांचा गौरव

## राष्ट्रीय साहित्य सूर्य तेजोमय पुरस्कार' प्रदान

**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**

आसरा सोशल फाउंडेशन, पुणे व ओम पब्लिकेशन, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'उत्कर्ष भारत सन्मान सोहळा - २०२६' हा भव्य राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळा नुकताच पुणे येथील पत्रकार भवन, गांजवे चौक येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. समाज, साहित्य, शिक्षण, कला, संस्कृती आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी गौरव करण्यात आला.

या सोहळ्यात यवतमाळ जिल्ह्यातील साहित्यिक, कवयित्री, लेखिका व समीक्षक मनिषा आनंदराव कांबळे यांना त्यांच्या साहित्य, समाजप्रबोधन आणि मानवकल्याणासाठीच्या प्रेरणादायी कार्याची दखल घेत 'राष्ट्रीय साहित्य सूर्य तेजोमय पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला ८९ अखिल भारतीय मराठी साहित्य



संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस, अभिनेते विजय गोखले, चित्रपट निर्माते धनराज

हाडके, उद्योजिका अर्चना मोरे समाजसेविका जयश्री भट मान्यवरांच्या शुभहस्ते त्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व गौरवचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे अभिनंदन केले.

मनिषा कांबळे यांनी आपल्या साहित्य लेखनातून सामाजिक जाणीवा, मानवी मूल्ये, स्त्री सक्षमीकरण, समता, बंधुता आणि परिवर्तनवादी विचार प्रभावीपणे मांडले आहेत. त्यांच्या साहित्यिक आणि सामाजिक योगदानाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याने यवतमाळ जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या या यशाबद्दल साहित्य, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास विविध क्षेत्रातील साहित्यिक, लेखक, कवी, समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ, पत्रकार आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कार वितरणाबरोबरच पुस्तक प्रकाशनाचा सोहळाही पार पडला. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला असून उपस्थितांनी आयोजकांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी समाजहितासाठी कार्य करणाऱ्या विविध मान्यवरांचा गौरव करण्यात आला. हा सोहळा उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

# व्रतस्थ लेखणीचा अस्त, एक दीपस्तंभ हरपला

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल, वर्धा

नागपूर येथील ज्येष्ठ पत्रकार आणि 'तरुण भारत'चे माजी मुख्य संपादक लक्ष्मणराव जोशी यांचे निधन मंगळवार, २८ जुलै २०२६ रोजी दुपारी २ वाजता त्यांचे निधन झाले. त्यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत 'तरुण भारत' या वृत्तपत्रात पत्रकार आणि मुख्य संपादक म्हणून काम केले होते. त्यांनी काही काळ गोव्यातही पत्रकारिता केली होती. त्यांच्या दुःखद निधनाने मराठी पत्रकारिता क्षेत्राने एक व्यासंगी, तत्त्वनिष्ठ आणि ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व गमावले आहे.

लक्ष्मणराव जोशी यांनी आपल्या पत्रकारितेच्या कारकिर्दीत अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली.पत्रकार हा समाजाचा आरसा असतो आणि सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे हे त्याचे सर्वात मुख्य कर्तव्य असते. याचे प्रतिबिंब त्यांच्या पत्रकारिकेत नेहमीच दिसायचे. आपल्या लेखणीतून त्यांनी गरिबी, भ्रष्टाचार, शिक्षण, आणि आरोग्य व्यवस्थेतील त्रुटींवर पत्रकार प्रकाश टाकला. शोषितांचा आवाज बनले समाजातील वंचित, गरीब आणि अन्यायग्रस्त घटकांचे प्रश्न ते प्रशासनापर्यंत आपल्या लेखणीने पोहोचविले.

अंधश्रद्धा, कौटुंबिक हिंसाचार आणि पर्यावरण ऱ्हास यांसारख्या विषयांवर लेख लिहून समाजात जागृती घडवून आणली. अनेकदा पत्रकारांच्या बातम्यांमुळे गंभीर प्रकरणांची दखल घेतली जाते आणि पीडितांना न्याय मिळतो. गेली अनेक दशके आदर्श आणि व्रतस्थ पत्रकार म्हणून त्यांचा गौरव झाला. विशेष अभ्यास राजकारण आणि गोसीखुर्द सिंचन प्रकल्पावर विपुल व प्रभावी लेखन केले. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकार सरकार आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देतात. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकार सरकार, जनता आणि प्रशासकीय यंत्रणा यांच्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमे ही सरकार आणि अधिकारी वर्गावर



अंकुश ठेवतात. लक्ष्मणराव जोशी यांनी आपल्या पत्रकारितेतून सरकार व प्रशासनाला अनेक प्रश्नांची जाणीव करून दिली.

एक चांगला पत्रकार केवळ स्वतःच्या बातम्या पुरवण्यापुरता मर्यादित न राहता नवीन व होतकरू पत्रकारांना कौशल्ये, मूल्ये आणि सत्यशोधनाची शिकवण देऊन नेहमी मार्गदर्शन करत असतो.

जसा एक चांगला शिक्षक उत्तम पिढी घडवतो, तसाच एक मार्गदर्शक पत्रकार लोकशाहीचा चौथा स्तंभ अधिक मजबूत आणि पारदर्शक बनवणारे दर्जेदार पत्रकार घडवतो.लक्ष्मणरावांनी अनेक पत्रकारांना घडवले,अनेकांना लिहिते केले. माझ्या पत्रकारितेची सुरुवातच लक्ष्मणराव जोशी यांच्या मार्गदर्शनातच झाली. लक्ष्मणराव जोशी यांनी तरुण भारत नंतर लोकशाही वार्ताचे संपादक झाले. लोकशाही वार्ता हे नवीन वृत्तपत्र होते. या नवीन वृत्त पत्रासाठी मला आंतरराष्ट्रीय सदर 'विश्ववार्ता ' हे सदर लिहिण्याची संधी मला स्व. लक्ष्मणराव जोशी व ज्येष्ठ पत्रकार विनोद देशमुख यांच्या मुळे मिळाली. विनोदजी देशमुख यांनी माझी भेट स्वर्गीय लक्ष्मणरावांशी करून दिली तेव्हा त्यांनी म्हटले की," तुमचे लेख खूप छान असतात.मला वाटले की तुम्ही खूप ज्येष्ठ आहात पण तुम्ही खूप लहान आहात, तुम्ही हा सदर लिहाल का? आमचे वृत्तपत्र नवीन आहे आम्ही तुम्हाला फार बांधण्यात येणार नाही पण मानधन देऊ हे नक्की हे त्यांचे उद्गार होते".

२०१३ पासून २०२५ पर्यंत माझे 'विश्ववार्ता' नियमित पणे लोकशाही वार्ता मधून दर शुक्रवारी प्रकाशित होत राहिले. विशेष म्हणजे २०१४ मध्ये केंद्रात नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले त्यांच्या विदेश दौऱ्याचा सर्व वृत्तांत मी 'विश्ववार्ता' या सदरातून नियमितपणे मांडण्याचा प्रयत्न केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पहिल्या पाचवर्षाच्या संपूर्ण विदेश दौऱ्यावर लेखन केले. या संपूर्ण लेखांचा संग्रह करून मी भारताचे परराष्ट्र धोरणः मोदी पर्व १ व भारताचे परराष्ट्र धोरण मोदी पर्व : २ हे दोन खंड प्रकाशित केले. लक्ष्मणरावांनी मला विश्ववार्ता हे आंतरराष्ट्रीय सदर लिहिण्याला खूप मदत केली. त्यांच्या अमूल्य मार्गदर्शनामुळेच मी हे सदर लिहू शकलो याचे श्रेय निश्चितच लक्ष्मणराव जोशी यांना जाते.

त्याचबरोबर हे सदर लिहिण्यासाठी मला वेळोवेळी जेष्ठ पत्रकार विनोद देशमुख यांचे देखील मोलाचे सहकार्य लागले लाभले.आज देखील मी लोकशाही वार्ता मधून नियमितपणे स्तंभ लेखन करत आहे. माझ्या पत्रकारितेचा खरा प्रवास लोकशाही वाटाणातून झाला. आज मी लोकशाही वार्तासह महाराष्ट्रातील अनेक वृत्तपत्रांमधून स्तंभलेखन करत आहे. लक्ष्मणराव जोशी यांनी माझ्यासारख्या अनेक लेखकांना लिहिते केले. बोलते केले. आज अनेक लेखक स्तंभलेखक व पत्रकार म्हणून समोर आलेले आहेत. याचे श्रेय निश्चितच लक्ष्मणराव जोशी यांना जाते.

शब्दांच्या माध्यमातून समाजाला दिशा देणारे ज्येष्ठ संपादक आज आपल्यात राहिले नाहीत. त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.

– ९५६१५९४३०६

# आयुष्य म्हणजे परीक्षांची साखळीच!



आयुष्य म्हणजे परीक्षांची साखळीच असते. आपल्याला अशा परीक्षांमधून, चाचण्यांमधून अनेकदा पार पडावे लागत असते. या चाचण्यांधील यशापयश स्वीकारावे लागतेच. त्यातून मार्ग सुकर होत असतात, कठीणही बनत असतात. अशावेळीही पुनः पुन्हा चाचण्यांना सामोरे जाऊन मार्गक्रमण करावे लागत असते. कधी परिस्थिती तुमची परीक्षा घेते, कधी शाळा, महाविद्यालये परीक्षा घेतात. कधी मालक, व्यवसाय परीक्षा घेत असतो तर कधी आपली व उपरी माणसेही परीक्षा घेत असतात. यातून चालत चालत आपण आपल्याला सिद्ध करीत असतो.

देहाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या या प्रवासात स्वत्व सिद्ध करण्याचे हे परीक्षाक्षण कधी आव्हानात्मक असतात तर, कधी काही वेळा सुकर व सुलभही असतात. मात्र कितीही झाले तरी 'देह' 'भान' विसरता येत नाही. नियती व निसर्ग हे अशा प्रकारे आपल्याला परीक्षांमधून भानावर आणत असतात. हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, हे भानावर आणणे म्हणजे नेमके काय आहे? तुम्ही तुमचा शोध घेता, तुमचे या विश्वातील अस्तित्व, सत्व, स्वत्व आणि तत्व अशा चार घटक परीक्षामधील प्रश्नांची उत्तरे शोधायची असतात. काहीवेळा या शोधात तुम्हाला परीक्षार्थी नव्हे तर परीक्षा घेणारे परीक्षकही व्हायचे असते.

आपले कोण, परके कोण मी नेमका कोण, देश, भाषा, धर्म यांचे नेमकेपण काय आहे अशा प्रकारच्या प्रश्नांना विचारून व्यक्ती, संस्था, समाज, नातेवाईक, मित्र, आपल्या निकटच्या वा अतिनिकटच्याही व्यक्ती यांचीही चाचणी व चाचपणी घ्यायची असते. तुम्ही केवळ परीक्षार्थी नव्हे तर परीक्षा घेणारेही असले पाहिजे.शेवटी आयुष्य मरेपर्यंत जगण्यासाठी नियती, निसर्ग यांनी तुम्हाला एकट्यालाच पाठवले आहे. यासाठी जीवन देहभान विस्मरून नव्हे तर स्मरून जगायला हवे. प्रवासात भेटत, मिळणारे प्रवासी कधी तनाने तर कधी मनाने आपापल्या ठिकाणी उतरतील याचा नेम नसतो; पण प्रवासात तुमच्या ठिकाणापर्यंत तुम्हालाच तुमच्या देहाचे भान ठेवायचे असते.

**– रवींद्र यशवंत बिवलकर**

# "महिमा गुरुपौर्णिमेचा"

गुरुब्रह्मा गुरुविर्ष्णुः
गुरुदेवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म
तस्मै श्री गुरवे नमः।

गुरुपौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर जगातील सर्व गुरुंना शतशः नमन.

दरवर्षी आषाढ शुक्ल पौर्णिमेला संपूर्ण भारतात गुरुपौर्णिमेचा सण साजरा केला जातो. आषाढ शुद्ध पौर्णिमेला गुरुपौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा म्हणतात. ज्यांनी महाभारत, पुराणे लिहिली त्या व्यासमुनींना वंदन करण्याचा, त्यांची पूजा करण्याचा हा मंगलदिन आहे. हिंदू, बौद्ध आणि जैन धमार्तील लोक या दिवशी आपल्या गुरूच्या स्मरणार्थ उपवास, पूजा इत्यादी करून हा सण आपापल्या परीने साजरा करतात.गुरुपौर्णिमेच्या सणाला फक्त आपल्या गुरूंचे स्मरण करण्याचा प्रयत्न असतो भारतीय संस्कृतीत व हिंदूंच्या जीवनपद्धतीमध्ये गुरूला अनन्यसाधारण महत्त्व आहे. गुरू आपल्याला अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जातात.गुरूंनी सांगितलेला एक शब्द किंवा त्यांची प्रतिमा सुद्धामाणसाचे रूप बदलू शकते. गुरूचे स्थान भगवंतापेक्षा श्रेष्ठ आहे.

गुरू आपल्या सुसंस्कृत समाजजीवनाचा आधारस्तंभ आहे. असे अनेक गुरू होऊन गेले, ज्यांनी आपल्या शिष्यांना



अशा प्रकारे शिक्षण दिले की त्यांच्या शिष्यांनी राष्ट्राची दिशाच बदलून टाकली. प्रत्येक व्यक्तीला गुरु असतो.आपल्या देशात रामायण-महाभारत काळापासून गुरु-शिष्य परंपरा चालत आली आहे.

आपण ज्यांच्याकडून विद्या प्राप्त करतो, मिळवतो, त्याच विद्येच्या बळावर आपण सर्वांचा उद्धार करीत असतो. अशा या गुरूंना मान देणे, आदराने कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य होय. महर्षी व्यासांपासून अशी प्रथा रूढ झाली, ती आजमितीपर्यंत. भारतीय गुरुपरंपरेत गुरु-शिष्यांच्या जोड्या प्रसिद्ध आहेत. जनक-याज्ञवल्क्य, शुक्राचार्य-जनक, कृष्ण, सुदामा-सांदिपनी, विश्वामित्र-राम, लक्ष्मण, परशुराम-कर्ण, द्रोणाचार्य-अर्जुन अशी गुरु-शिष्य परंपरा आहे. मात्र एकलव्याची गुरुनिष्ठा पाहिली की, सर्वांचेच मस्तक नम्र झाल्याशिवाय राहत नाही. ज्ञानेश्वरांनी सुद्धा ज्ञानेश्वरी लिहिताना 'व्यासांचा मागोवा घे तू' असे व्यास ऋषी बद्दल गौरवोद्गार काढले आहेत.तसेच क्रिकेटपटू असो की गायक कलाकार असो, प्रत्येक जण आपल्याला गुरूकडून मिळालेल्या ज्ञानावरच त्या त्या क्षेत्रात सर्वोच्च पदाला पोहोचलेला आहे. त्यामुळे गुरूचे महत्त्व अनन्यसाधारण असते.

स्वामी विवेकानंदांनी तर निसर्ग हा मानवाचा सर्वात मोठा गुरू असल्याचे म्हटले आहे. निसगार्तील प्रत्येक प्राण्याकडून व घटकाकडून आपणास काही ना काही चांगला गुण शिकावयास मिळत असतो. कुंभार ज्या प्रमाणे मातीच्या गोळ्याला आकार देऊन मडके बनवतो. त्याचप्रमाणे गुरु सजीव मानव रुपी व्यक्तिमत्त्वाला आपल्या संस्कारांनी आदर्श घडवतात. गुरूचे ज्ञान सागराप्रमाणे अथांग आहे.आपल्या जीवनात गुरूंचे नानाविध रूपे आपणास पहावयास मिळतात. मूल गर्भात असल्यापासून आई त्याच्यावर उत्तम संस्कार करते. आई आपली पहिली गुरु असते.जे जे लोक आपल्याला जगण्यासाठी नेहमी चांगले संस्कार देतात, ते आपले गुरूच आहेत. गुरु ला वयाचे, जातीचे बंधन नसते. आताचा काळ बदललेला आहे. शिक्षण पद्धती बदललेली आहे. गुरु आणि शिष्य यांचे नाते मात्र बदललेले नाही. ते आजही पवित्र मानले जाते. आजपर्यंत जगात ज्या थोर व्यक्ती होऊन गेल्या त्यांच्यावर त्यांच्या गुरूंचाच अमित प्रभाव होता. आपल्या गुरूंचा ही आपल्यावर खूप प्रभाव असतो.

आई-वडिलांनंतर शिक्षकच हा गुरु असतो. शिक्षक हा पूर्ण विषयाचं मार्गदर्शन चांगलं वळण मुलांना लावण्याचा प्रयत्न करीत असतो समाज निर्मितीचे कार्य करीत असतो.

ज्या समाजात राष्ट्रात गुरूंना मान असतो त्या राष्ट्राची प्रगती सर्वात चांगली होते. गुरु प्रमाणे शिष्य घडत असतो. म्हणून आपण आपल्या गुरूंच्या आज्ञेचे पालन करायला हवे. त्यांच्या शब्दांचा आदर करायला हवा. ज्यांच्या आयुष्यात चांगला गुरु लाभतो त्यांना आयुष्यात चांगल्या वाईट संकटांना सामोरे जाण्यास आत्मबळ मिळते. चांगला अभ्यास करून गुरूचा, देशाचा, शाळेचा व आई-वडिलांचे नावलौकिक करायला हवे.आजच्या वेगवान आणि तंत्रज्ञानाने चाललेल्या जगात, शिक्षक आणि मार्गदर्शकांची भूमिका नेहमीसारखीच महत्त्वाची आहे. शिक्षक केवळ शैक्षणिक ज्ञानच देत नाहीत तर विद्यार्थ्यांचे चारित्र्य आणि मूल्ये घडवण्यातही महत्त्वाची भूमिका बजावतात. अशा या गुरुपौर्णिमेची महिमाच अनन्य साधारण. ही गुरू परंपरा जोपासायला हवी आपल्या पिढी करीता आणि येणाऱ्या पिढीकरिता. कुठल्याही क्षेत्रातील असो गुरुचे मार्गदर्शन जीवनाची लढाई यशस्वी पार पाडण्यासाठी महत्वाची भूमिका बजावत असते.

आई-वडिलांनी जन्म दिला, पण गुरुने शिकवली जगण्याची कला,ज्ञान, चरित्र आणि संस्कारांची शिकवण आम्हाला मिळाली आहे,अशा आमच्या गुरुंना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा !..

**– प्रा. वैशाली विजय गोरले, कुही**

# दोन भिन्न शैली, एकच ध्येयः गौतम गंभीर आणि व्ही. व्ही. एस. लक्ष्मण यांच्या कार्यपद्धतीचा व कामगिरीचा 'टीम इंडिया'वरील प्रभाव

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारतीय क्रिकेटच्या इतिहासात नेतृत्व आणि मार्गदर्शनाची शैली प्रत्येक कालखंडात बदलत गेली आहे. सध्या भारतीय वरिष्ठ संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची धुरा गौतम गंभीर यांच्याकडे आहे, तर 'नॅशनल क्रिकेट अकादमी' (एनसीए) चे प्रमुख आणि युवा / अंतरिम संघाचे मार्गदर्शक म्हणून व्ही. व्ही. एस. लक्ष्मण कार्यरत आहेत.

मैदानातील खेळाडू ते ड्रेसिंग रूममधील मार्गदर्शक अशा दोन्ही भूमिकांमध्ये या दोन दिग्गजांचा प्रभाव थक्क करणारा आहे. परंतु, दोघांची काम करण्याची पद्धत परस्परविरोधी आणि अत्यंत भिन्न आहे. एका बाजूला गंभीर यांची 'आक्रमक व थेट' शैली आहे, तर दुसऱ्या बाजूला लक्ष्मण यांची 'शांत व संयमी' कार्यपद्धती.

**गौतम गंभीरः आक्रमक व निकालकेंद्री कार्यपद्धती**

गौतम गंभीर यांची प्रशिक्षक म्हणून काम करण्याची पद्धत ही त्यांच्या फलंदाजीसारखीच सरळ, आक्रमक आणि बिनधास्त आहे. कोणत्याही परिस्थितीत विजय मिळवणे हेच त्यांचे अंतिम ध्येय असते.

**कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये व फायदेः**

'विनिंग माइंडसेट' व स्पष्टताः गंभीर यांच्या रणनीतीत जिंकण्याची मानसिकता सर्वात वर असते. ते खेळाडूंना रोखठोक सल्ला देतात, ज्यामुळे संघात प्रत्येकाला स्वतःच्या भूमिकेबद्दल स्पष्टता असते.

**निर्भीड खेळ (फिअरलेस खेळ)**: त्यांच्या मार्गदर्शनाखाली संघात भीतीमुक्त खेळण्याची संस्कृती रुजते.

**मोठ्या सामन्यांचे दडपणः** स्वतः दोन विश्वचषक फायनलचे नायक राहिल्यामुळे कठीण प्रसंगात खेळाडूंना मानसिकदृष्ट्या मजबूत बनवण्यात ते यशस्वी ठरतात.

**संभाव्य आव्हानेः**

अति-आक्रमकतेमुळे आणि रोखठोक वक्तव्यांमुळे काही वेळा ड्रेसिंग रूममध्ये तणाव निर्माण होण्याची किंवा वरिष्ठ खेळाडूंशी मतभेद होण्याची शक्यता असते. सातत्याने कठोर निर्णय घेतल्यास काही प्रसंगी नवोदित खेळाडूंच्या आत्मविश्वासावर परिणाम होऊ शकतो.

**वरिष्ठ संघासाठी बजावलेली कामगिरीः**

मर्यादित षटकांच्या खेळात वर्चस्वः वरिष्ठ संघाचे मुख्य प्रशिक्षक पद सांभाळल्यापासून त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारताने एकदिवसीय आणि टी-२० प्रकारात आक्रमक क्रिकेटचे धोरण स्वीकारले.

**मोठ्या मालिका व स्पर्धाः** टी-२० आणि एकदिवसीय प्रकारात प्रतिस्पर्ध्यांवर दबाव टाकून मालिका जिंकण्यावर आणि खेळाडूंना आक्रमक ब्रँडचे क्रिकेट खेळण्यास प्रोत्साहित करण्यावर त्यांचा मुख्य भर राहिला आहे.

**व्ही. व्ही. एस. लक्ष्मणः** शांत, संयमी व नियोजनबद्ध कार्यपद्धती

व्ही. व्ही. एस. लक्ष्मण यांची शैली त्यांच्या खेळाप्रमाणेच अत्यंत शांत, संयमी आणि शिस्तबद्ध आहे. परिणामांपेक्षा खेळाडूच्या कौशल्याचा विकास कसा होतो, यावर त्यांचा अधिक भर असतो.

**कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये व फायदेः**

सुरक्षित व सकारात्मक वातावरणः लक्ष्मण हे खेळाडूंशी अतिशय आपुलकीने संवाद साधतात, ज्यामुळे युवा खेळाडूंना दडपणमुक्त आणि सुरक्षित वातावरण मिळते.

दीर्घकालीन खेळाडू विकासः खेळाडूंच्या तंत्रातील आणि मानसिकतेतील त्रुटी शांतपणे दूर करून त्यांना भविष्यातील मोठ्या आव्हानांसाठी तयार केले जाते.

भक्कम पायाः युवा खेळाडूंचा पाया मजबूत करणे आणि भारताची 'बेंच स्ट्रेंथ' तयार करणे हे त्यांचे मुख्य कौशल्य आहे.

संभाव्य आव्हानेः अति-संयम किंवा सुरक्षित रणनीतीमुळे टी-२० सारख्या अत्यंत वेगवान खेळात झटपट आणि आक्रमक निर्णय घेण्यात काही वेळा अडचण येऊ शकते.

अत्यंत उग्र प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध मैदानावर तितकाच आक्रमक पलटवार करण्याची आक्रमकता कमी पडू शकते.

एनसीए व अंतरिम मार्गदर्शक म्हणून कामगिरीः

युवा व 'इंडिया-ए' संघाची बांधणीः अंडर-१९ आणि 'इंडिया-ए' संघांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळू शकणाऱ्या खेळाडूंची मजबूत 'बेंच स्ट्रेंथ' तयार केली.

एशियन गेम्स व द्विपक्षीय मालिकाः हँगझोऊ एशियन गेम्समध्ये भारतीय युवा पुरुष संघाला सुवर्णपदक मिळवून देण्यात आणि वरिष्ठ खेळाडूंच्या विश्रांतीदरम्यान युवा संघाला अनेक आंतरराष्ट्रीय मालिका जिंकवून देण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा राहिला.

खेळाडूंचे पुनर्वसन : दुखापतग्रस्त वरिष्ठ खेळाडूंना 'एनसीए'च्या माध्यमातून पुन्हा फिट करून संघात आणण्यात आणि त्यांची कारकीर्द प्रदीर्घ ठेवण्यात लक्ष्मण यांचे योगदान मोलाचे आहे.

**भारतीय क्रिकेटसाठी 'सुवर्णयोग'**

गौतम गंभीर आणि व्ही. व्ही. एस. लक्ष्मण या दोन्ही दिग्गजांची उपस्थिती भारतीय क्रिकेटसाठी पूरक आणि अत्यंत लाभदायक ठरत आहे. कोणत्याही यशस्वी संघासाठी 'आक्रमकता' आणि 'संयम' या दोन्ही घटकांची समान गरज असते.

लक्ष्मण हे 'एनसीए' आणि युवा यंत्रणेद्वारे कच्च्या हिऱ्यांना पैलू पाडून भारतीय क्रिकेटचा पाया मजबूत करत आहेत, तर गंभीर हे त्या तयार झालेल्या हिऱ्यांना आंतरराष्ट्रीय मैदानात थेट आक्रमकपणे वापरून विजय मिळवून देत आहेत. थोडक्यात सांगायचे तर, लक्ष्मण हे भारतीय क्रिकेटचे 'सुरक्षा कवच' आहेत, तर गंभीर हे संघाचे 'धारदार शस्त्र' आहेत.

सध्या गौतम कडून काही गंभीर चुका होत असल्याने संघाला पराभवांचा सामना करावा लागत आहे. गैरहजेरीत लक्ष्मणने संघाची गाडी पूर्वपदावर आणली आहे. त्यामुळे लक्ष्मणलाच मुख्य प्रशिक्षक पदावर कायम ठेवावे असा लोकांचा सूर उमटत आहे. मात्र बीसीसीआय २०२७ विश्व चषकापर्यंत तरी यत बदल करण्याची शक्यता दिसत नाही.

– ९०९६३७२०८२